www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
मराठी
# युवक आधार

दै. युवक आधार करीता
प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग
खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापूर,
अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर
प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 178 वार : शुक्रवार दि.14 मार्च २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळणार केंद्राकडून बूस्टर; गडचिरोली माईनिंग हब

**नवी दिल्ली :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नवी दिल्ली येथे भेट घेत, त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली.

राज्य सरकारने गडचिरोली येथे पोलाद क्षेत्रात मोठा पुढाकार घेतला असून, गडचिरोली आता देशाची स्टीलसिटी म्हणून विकसित होत आहे. यादृष्टीने गडचिरोलीला येत्या काळात माईनिंग हब म्हणून विकसित करण्यासाठी केंद्राने सहकार्य करावे, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

नागपूर विमानतळाच्या कामाला सुद्धा गती देण्यात आली असून, त्यात केंद्र सरकारसंदर्भातील काही विषयांबाबतदेखील फडणवीस यांनी यावेळी चर्चा केली. यामुळे विमानतळ कामातील अडसर आता लवकरच दूर होतील. स्थानिक स्वराज्य संस्थांना १५व्या वित्त आयोगाचा निधी लवकरात लवकर मिळावा, असाही एक विषय या चर्चेत होता. या सर्व बाबतीत सकारात्मक प्रतिसाद पंतप्रधान मोदी यांनी दिला.

वर्ल्ड ऑडिओ, व्हिज्युअल अँड एन्टरटेंटमेंट समिट मुंबई येथे आयोजित करण्याची संधी महाराष्ट्राला दिल्याबद्दल या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी पंतप्रधान मोदी यांचे आभार मानले.

**ऑडिओ आणि व्हिज्युअल क्षेत्रातील दिग्गज मुंबईत येणार**

माहिती-तंत्रज्ञान आणि मनोरंजनाच्या क्षेत्रातील दिग्गजांची 'वेव्हज् २०२५' ही चार दिवसीय परिषद मुंबईत आयोजित करण्यात आली असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. ही परिषद १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणार आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने विविध देशांचे राजदूत आणि उच्चायुक्तसाठी 'वेव्हज् २०२५' बाबत बैठक आयोजित केली होती. यावेळी केंद्रीय मंत्री डॉ. एस. जयशंकर, केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव, केंद्रीय राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले की, क्रिएटिव्ह इंडस्ट्री ही सर्वात वेगाने वाढणारी ५० बिलियन डॉलरची अर्थव्यवस्था आहे. अशात, ऑडिओ आणि व्हिज्युअल क्षेत्रात क्रिएटिव्ह काम करणाऱ्या जागतिक ख्यातीच्या किमान शंभर कंपन्यांचे प्रमुख या परिषदेत सहभागी होणार आहेत. क्रिएटिव्हिटी क्षेत्रातील ही सर्वात मोठी परिषद असेल.



केंद्र सरकारने इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी मुंबईत सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. ही इन्स्टिट्यूट गोरेगाव येथे होणार असून, केंद्र सरकार ४०० कोटी रुपये खर्च करणार आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

द • ख • ल

## प्रकाश बापू सोळंके यांच्या सूचनेने आमरण उपोषण मागे..



**दैनिक युवक आधार**
**मंठा प्रतिनिधी :-** महाराष्ट्र नवनिर्माण सेना जालना जिल्हा अध्यक्ष प्रकाश (बापू) सोळंके आणि श्री साई ड्रायव्हर युनियन संघटनेच्या सूचनेवरून उपोषण मागे घेतले असून ऊस्वत म्हणतात हातुर मातुर डाग रोजी संदर्भात म्हणता येथे सार्वजनिक बांधकाम उपविभाग म्हणतात (दि ७) रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे मंठा शहर अध्यक्ष गजानन बबनराव माळकर हे उपोषणास बसले असताना सोमवारी चार दिवसानंतर सायंकाळी जिल्हाध्यक्ष सोळंके यांच्या सूचनेवरून आमरण उपोषण मागे घेण्यात आले या दरम्यान सार्वजनिक बांधकाम विभाग मंठा इंजिनियर भगवान शिंदे, श्री वाघ, श्री साई ड्रायव्हर युनियन संघटनेचे अध्यक्ष संजय काळे, जय भीम सेना अध्यक्ष उद्धव सरोदे, संदीप गायकवाड यांच्या उपस्थितीमध्ये लिंबू सरबत देऊन उपोषण मागे घेण्यात आले...

## जातीयतेचे दाहक चटके विज्ञान युगातही विझेना...

### मंठा तालुक्यातील दहिफळ खंदारे येथे यात्रेमध्ये महिलेचे छेड जातीवाचक शिवीगाळ गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**मंठा प्रतिनिधी :-**
**नामदेव.मंडपे. मंठा जालना**

काळुबा महाराज यात्रा प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी मंठा तालुक्यातील दहिफळ खंदारे येथे शिवरात्री निमित्ताने यात्रा भरली गेली या यात्रेकरिता लेकी माहेरी येतात. त्यातच प्रार्थना राहुल शेजुळ , पती, मामा, नणंद सर्वजण मिळून दि. 28 फेब्रुवारी रोजी यात्रेमध्ये गेले असताना रहाट पाळण्यातून उतरल्यावर अनोळखी व्यक्ती पाठलाग करून जवळ येऊन मोबाईल नंबर मागून केसाला हाताला आणि साडीच्या पदराला वाईट हेतूने स्पर्श केला असता हा प्रकार पती राहुल यांनी पाहिला असताना लोखंडी रॉड ने जबर मारहाण केली.१)युवराज संजय जाधव २) पियुष गजानन राठोड ३)जितेश गजानन राठोड ४) सिद्धार्थ रमेश राठोड यांच्या विरुद्ध जातीवाचक मारहाण शिवीगाळ प्रकरण मंठा पोलीस ठाणे गुन्हा नोंद केला असून अधिक तपास डीवायएसपी दादाहरी चौरे आहेत. 14 दिवस उलटूनही उठली कारवाई होत नसल्याने ऑल इंडिया पॅंथर सेनेच्या वतीने मंठा पोलीस ठाणे अंमलदार निवेदन देताना रवी सदावर्ते, उपनगराध्यक्ष अरुण वाघमारे, शरद मोरे, समाधान शिंदे, मुकेश काऊतकर, महेंद्र टेकुळे आणि दहिफळ खंदारे येथील महिला पुरुष दरम्यान आंदोलन करण्याचा इशारा जिल्हाध्यक्ष रवी सदावर्ते यांनी दिला..



## पनवेल महानगरपालिका तर्फे आव्हान

### JE / जापनीस ऐनकेफेलाईटीस हा आजार काय आहे- डॉ महेश मोहिते लहान मुलांनासाठी लस उपलब्ध

**दैनिक युवक आधार**
**मुकुंद कांबळे**
**उपसंपादक**



JE / जापनीस ऐनकेफेलाईटीस (Japanese Encephalitis) हा एक मेंदुज्वर आजाराचा प्रकार आहे. आपल्या रायगड जिल्हयातही या आजाराचे रुग्ण आढळले आहेत. हा आजार डासांपासुन पसरणाऱ्या विषाणुचा प्रकार आहे, जो लहान मुलांकरिता जीवघेणा ठरु शकतो. यामध्ये 30% रुग्ण दगावले जाऊ शकतात तर 40% रुग्णांना कायमचे अपंगत्व येऊ शकते.असे बालरोग तज्ञ डॉ महेश मोहिते यांनी माहिती देताना सांगितले व या आजारावर आजतागायत कोणताही निश्चित अथवा ठोस उपाय उपलब्ध नसल्याने हा आजार होऊ नये याकरिता शासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन या आजाराची लस मोफत उपलब्ध केली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नियोजनाप्रमाणे यापुर्वी 10 जिल्ह्यात लहान मुलांना ही लस देण्यात येत आहे. यावर्षी नविन 03 जिल्ह्यांपैकी रायगड जिल्हयाचा सामावेश केलेला असुन त्यामध्ये पनवेल महानगरपालिकेचा अंर्तभाव करण्यात आलेला आहे. त्यानुषंगे शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील 01 ते 15 वर्ष वयोगटातील सर्व मुलांना दिनांक 01 मार्च 2025 पासुन ही लस अंगणवाडी, शासकीय, निमशासकीय, खाजगी शांळामध्ये तसेच पनवेल क्षेत्रातील शाळाबाहय परिसरात मोफत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. अशी माहिती बालरोग तज्ञ महेश मोहिते यांनी दिली तसेच JE हि लस अंत्यत सुरक्षित असल्या कारणाने जागरुक पालकांनी आपल्या बालकांना या गंभीर आजारापासुन सुरक्षित ठेवण्यासाठी, पनवेल महानगरपालिकेने नियोजित केलेल्या ठिकाणी आपल्या बालकाचे न चुकता लसीकरण करुन घेण्याचे सर्व पनवेलकरांना आवाहन.

## अभिनेता विकास वायाळ याची दादासाहेब फाळके चित्रपट यूनियनच्या मुंबई कार्याध्यक्ष पदी निवड

**दैनिक युवक आधार**
**संतोष आमले**
**संपादक**



: प्रसिद्ध अभिनेता विकास वायाळ याची दादासाहेब फाळके चित्रपट यूनियनच्या मुंबई कार्याध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. चित्रपट क्षेत्रातील आपल्या जबाबदारी आणि कार्यक्षमतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या विकास वायाळ यांनी या पदी निवड होणं म्हणजे एक मोठा मान आहे. निवडी दरम्यान दादासाहेब फाळके चित्रपट विनंती अध्यक्ष अजित म्हामुणकर या वेळी बोलताना सांगितले विकास वायाळ हे सिनेमा आणि टीव्ही मालिका मध्ये आपल्या अभिनयाने विशेष स्थान निर्माण करणारे कलाकार आहेत. त्यांच्या निवडीवर संघटनेच्या सदस्यांनी आनंद व्यक्त केली आहे. आगामी काळात विकास वायाळ आपल्या कार्याध्यक्षपदी काम करत असताना मुंबईतील चित्रपट सृष्टीतील अभिनय करणाऱ्या कलाकारांना न्याय मिळून देतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे. दादासाहेब फाळके चित्रपट यूनियन ही चित्रपट टीव्ही मालिकातील कलाकारांच्या न्याय हक्कासाठी लढणारी एक प्रमुख संघटना असून, चित्रपट क्षेत्राशी संबंधित विविध मुद्द्यांवर काम करणारा एक महत्त्वाचा प्लॅटफॉर्म आहे. वायाळ यांच्या निवडीमुळे युनीयनच्या कार्यकुशलतेत आणखी वाढ होईल, असा विश्वास संघटनेचे अध्यक्ष अजित म्हामुणकर व पदाधिकारी यांनी व्यक्त केला आहे. विकास वायाळ यांच्या आगामी योजनांमध्ये संघटनेच्या सदस्यांच्या कल्याणासाठी तसेच चित्रपट व मालिका क्षेत्रातील कलाकराच्या विकासासाठी विविध कार्यक्रम आणि उपक्रम राबवण्याचा समावेश आहे.

## नागाव ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचार उघड! कधी होणार चौकशी? गावकऱ्यांचा संताप तर राजकीय पुढारी गप्प का?

**दैनिक युवक आधार**
**प्रदीप पाटील**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

नागाव ग्रामपंचायतीमध्ये विकासकामांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ओएनजीसीकडून मिळालेल्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचा गैरवापर होत असून, ग्रामपंचायत सदस्य स्वतःच कंत्राटदार बनून निविदा प्रक्रियेत हेराफेरी करत असल्याचे समोर आले आहे. ग्रामस्थांच्या मते, पिण्याच्या पाण्याच्या पाइपलाइनसाठी निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात येत आहे. खोदकामाच्या नियमांकडे दुर्लक्ष करून उथळ खोदाई केली जात असल्याने अवजड वाहनांच्या दाबाने पाइपलाइन तुटण्याचा धोका निर्माण झाला आहे. तसेच, रस्त्यावरील काँक्रिटच्या कामात हलगर्जीपणा केला जात असल्याने नागरिकांना धुळीच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. ग्रामपंचायतीत गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या ग्रामविकास अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थांनी आणि सामाजिक संघटनांनी केली आहे. पंचायत समितीतील काही कर्मचाऱ्यांच्या मदतीने ऑनलाइन टेंडर प्रक्रियेत हेराफेरी केली जात असल्याची चर्चा आहे. ठराविक ठेकेदारांना कामे देऊन मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केला जात असल्याचा आरोप आहे. गेल्या काही वर्षांपूर्वी पिण्याच्या पाणीपुरवठा योजनेतील भ्रष्टाचार उघड झाल्यानंतर माजी सरपंचांना पदावरून पायउतार व्हावे लागले होते. तसेच, पाणीपुरवठा विभागातील एका कार्यकारी अभियंत्यालाही नोकरी गमवावी लागली होती. जर सध्याच्या सरपंचांनीही अशा भ्रष्ट कारभाराकडे दुर्लक्ष केले, तर त्यांच्यावर कारवाई होणार का? असा सवाल ग्रामस्थ विचारत आहेत. 1984 च्या सिडको आंदोलनात आघाडीवर असलेले नागावमधील सामाजिक पुढारी आणि कार्यकर्ते सध्याच्या भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर मात्र शांत असल्याने ग्रामस्थ आश्चर्यचकित आहेत. ही शांतता संशयास्पद असून, राजकीय पुढारी आणि प्रभावशाली व्यक्तींनी हात आखडता घेतल्यामुळेच भ्रष्टाचार वाढल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत. ग्रामसेवकांच्या मालमत्तेची सखोल चौकशी केली तर निश्चितच आर्थिक घोटाळा उघडकीस येईल, असा ग्रामस्थांचा विश्वास आहे. आता प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून तातडीने कारवाई होत नाही, तर ग्रामस्थ मोठ्या आंदोलनाचा इशारा देण्याची शक्यता आहे.



# आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त मातृशक्तीचा सन्मान

### विविध क्षेत्रातील नामवंत महिलांचा हिंदी मराठी पत्रकार संघातर्फे गौरव

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**






आंतरराष्ट्रीय महिला दिवसाच्या निमित्ताने आयोजित महिला सन्मान कार्यक्रमात विविध क्षेत्रांमध्ये अग्रेसर असलेल्या महिलांचा सत्कार मलकापूर येथे हिंदी मराठी पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आला.


या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून हिंदी मराठी पत्रकार संघाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष धनश्रीताई काटीकर पाटील तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा सत्र न्यायालयाच्या अड सुवर्णाताई चोपडे , वीरसिंग दादा राजपूत जेष्ठ पत्रकार अजय टप जेष्ठ पत्रकार, प्रल्हाद ढोले संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती, राजेश इंगळे संपादक आतिशभाई खराटे जिल्हा नेते हे होते. जागतिक महिला दिन निमित्य आयोजित सदर कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या पूजनाने झाली यावेळी प्रथम महिला संपादिका तानुबाई बिरजे व आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करण्यात आले. कार्यक्रमांमध्ये महिला पोलीस, महिला वकील, महिला शिक्षिका, महिला डॉक्टर, महिला उद्योजिका, महिला खेळाडू, महिला अधिकारी महिला मुख्याध्यापिका, परिचारिका, अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस, आशा सेविका, यांना स्मृतिचिन्ह तसेच भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या पुढील भागात पत्रकार बांधवांना सत्कार करण्यात आला कार्यक्रमाला शेकडो महिला भगिनींनी हजेरी लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली . यावेळी अध्यक्षीय भाषणामध्ये बोलताना हिंदी मराठी पत्रकार संघाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष धनश्रीताई काटीकर पाटील यांनी महिलांना आत्मविश्वासाने संपूर्ण जग जिंकता येते आज महिला प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर होत आहे हिंदी मराठी पत्रकार संघातर्फे दरवर्षी महिलांचा सन्मान सोहळा आयोजित केला जात असून ही परंपरा नेहमी कायम राहील असे आश्वासन याप्रसंगी दिले. कार्यक्रमाचा यशस्वी होण्यासाठी श्रीकृष्ण तायडे, विनायक तळेकर, प्रकाश थाटे, संपादक भीमगर्जना, शेख निसार संपादक छत्रपतीचे राज्य, प्रदीप इंगळे महाराष्ट्र ग्रामीण न्युज, सय्यद ताहेर संपादक मलकापूर अबतक, सुधाकर तायडे, मयूर लड्डा यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची यशस्वी सूत्रसंचालन रवींद्र गंनगे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन सुधाकर तायडे यांनी केले.

## 'युध्द पेटले आहे"या काव्यसंग्रहास महाराष्ट्र शासनाचे अनुदान.

### कवी बाळासाहेब नागरगोजे यांच्या काव्यसंग्रहाची राज्यस्तरावर दखल.

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)** - महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ- मुंबई (महाराष्ट्र शासन ) यांच्या नवलेखक अनुदान योजनेंतर्गत बाळासाहेब नागरगोजे यांनी लिहिलेल्या "युध्द पेटले आहे" या काव्यसंग्रहाची राज्यस्तरावरील साहित्य विषयक तज्ज्ञ समितीकडून निवड झाली आहे. बाळासाहेब नागरगोजे यांनी विविध वर्तमानपत्रांतून महाविद्यालयीन जीवनापासूनच सातत्याने लेखन केले आहे. कविता, लेख, कथा, नाटके इ. विषयांना त्यांनी स्पर्श केला आहे. मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांसह देशांतर्गत व जागतिक विविध भाषांमधील अनुवादित साहित्य हा त्यांच्या आवडीचा प्रांत आहे. "युद्ध पेटले आहे" हे भगतसिंहांचे शब्द आहेत. शहीद भगतसिंह व त्यांच्या सहकाऱ्यांचे अतुलनीय बलिदान व त्यांची प्रखर व प्रेरणादायी विचारधारा ही काव्यसंग्रहाची प्रमुख प्रेरणा आहे. सदरील काव्यसंग्रहाची प्रस्तावना ज्येष्ठ साहित्यिक तसेच एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री.अनंत कराड सर यांनी लिहिलेली आहे. तर काव्यसंग्रहाची पाठराखण (ब्लर्ब) साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कवी व लेखक डॉ.वीरा राठोड सर यांनी लिहिली आहे. राज्य-देश व जागतिक पातळी वरील समकालीन घटनांबरोबरच मानवी दुःख, ऊसतोड कामगार, बालमजूरी, स्त्री




भ्रूणहत्या, आदिवासी समाजाची दुरवस्था, सामाजिक व आर्थिक विषमता, जातीय व धार्मिक प्रश्न तसेच क्रांतिकारकांचे राष्ट्रउभारणीतील योगदान अशा बहुविध विषयांना नागरगोजे यांनी त्यांच्या कवितांच्या माध्यमातून व्यापक स्पर्श केला आहे. जानेवारी-२०२५ मध्ये हा काव्यसंग्रह महाराष्ट्रभर प्रकाशित झाला असून Amazon वर सुध्दा तो उपलब्ध आहे. महाराष्ट्रात "युध्द पेटले आहे" ची वाचकांकडून मागणी सातत्याने वाढत आहे. बीड जिल्ह्यातील कवीची महाराष्ट्र शासनाच्या अनुदानासाठी निवड झाल्यामुळे सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# जलयुक्त शिवार योजनेसाठी सामाजिक संस्था उत्सुक

**‘गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार’ योजनेसाठी एटीई चंद्रा फाऊंडेशनसोबत सामंजस्य करार**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प**

**मुंबई :** राज्यात ‘जलयुक्त शिवार योजना २’ अंतर्गत ‘गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार’ योजना राबवण्यात येत आहे. या योजनेच्या माध्यमातून धरणांमधील पाणीसाठा वाढण्यासोबतच शेतीची सुपिकता वाढण्यासही मोठ्या प्रमाणावर मदत होत आहे. या योजनेच्या राज्यातील अंमलबजावणीबाबत एटीई चंद्रा फाऊंडेशन आणि मृद आणि जलसंधारण विभागात मंत्रालयात सामंजस्य करार करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबाबत एटीई चंद्रा फाऊंडेशनच्या अमित चंद्रा यांनी गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेमध्ये काम करण्याविषयी संपर्क केला होता. त्यांच्या या विनंतीस मान देऊन एटीई चंद्रा फाऊंडेशनने या योजनेसाठी हा सामंजस्य करार केला आहे.

गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महत्त्वाकांक्षी योजनेमध्ये सामाजिक संस्था काम करण्यासाठी उत्सुक आहेत. नुकतेच या योजनेमध्ये एटीई चंद्रा फाऊंडेशन सक्रिय सहभागी होणार असल्यामुळे राज्यातील पाण्याची उपलब्धता वाढवण्यासोबतच जमिनीची सुपिकता वाढून शेतकऱ्यांच्या उत्पादनामध्येही चांगली वाढ होण्यात मदत होणार आहे. तसेच या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये मृद व जलसंधारण विभागाने फौंडेशनला सर्वते सहकार्य करावे अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी विभागाला दिल्या आहेत.

एटीई चंद्रा फाऊंडेशनच्या एका सहा वर्षाच्या अभ्यासानुसार, भारतातील जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी (आरडब्ल्यूबी) समुदाय-नेतृत्वाखालील, तंत्रज्ञान-सक्षम मॉडेल ग्रामीण जलसुरक्षा वाढविण्यासाठी एक महत्त्वाचा हस्तक्षेप असू शकतो. संमिश्र भू-वापर पुनर्संचयित आणि मूल्यांकन साधन (सीएलएआरटी जीआयएस) आणि एव्हीएनआय ग्रामीण ॲप भूजल पुनर्भरणाची क्षमता असलेल्या जलस्त्रोतांची ओळख पटवू शकतात आणि शेतकरी स्तरावर भौगोलिक-टॅग केलेल्या प्रतिमा आणि पडताळणीद्वारे जलस्त्रोत पुनर्संचयित करण्यासाठी अशा हस्तक्षेपांचे निरीक्षण करण्यास सक्षम करू शकतात. म्हणूनच, आरडब्ल्यूबी भारताच्या जल आव्हानांवर एक किफायतशीर उपाय असू शकतो, जो पर्यावरणीय, आर्थिक आणि सामाजिक फायदे प्रदान करतो.




### अमृत सरोवर मॉडेल

अमृत सरोवर हा उपक्रम बराच अंशी ‘गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार’ या उपक्रमावर आधारित आहे. अमृत सरोवर मॉडेल भारत सरकारचा जलसंधारण आणि जलाशय पुनरुज्जीवनासाठीचा उपक्रम आहे, जो ‘आजादी का अमृत महोत्सव’ अंतर्गत सुरू करण्यात आला. या मॉडेलचा उद्देश ग्रामीण भागातील पारंपरिक जलस्रोतांचे पुनरुत्थान करून भूजल पातळी वाढवणे आणि पर्यावरण सुधारणा करणे आहे. यासाठी स्थानिक प्रशासन, ग्रामपंचायती आणि नागरिकांची सक्रिय भागीदारी घेतली जाते. मनरेगा आणि अन्य सरकारी योजनांच्या मदतीने जिल्ह्यात किमान ७५ अमृत सरोवर विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यामुळे जलसंधारणासह शेती आणि पशुपालनालाही चालना मिळेल, तसेच ग्रामीण भागातील जलस्वावलंबन वाढेल.

### डेटा संकलन आणि नियंत्रण

या सामंजस्य करारानुसार या योजनेसाठी एटीई चंद्रा फाऊंडेशन तांत्रिक सहाय्यासह, प्रकल्प व्यवस्थापन कक्ष स्वरुपात मनुष्यबळ सहाय्य उपलब्ध करून देणार आहे. एटीई चंद्रा फाऊंडेशनच्या वतीने विकसित करण्यात आलेल्या अवनी ग्रामीण ॲपच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने योजनेतील कामांच्या डेटाचे संकलन आणि नियंत्रण करण्यात येणार आहे. तसेच फाऊंडेशनमार्फत स्वयंसेवी संस्थांमध्ये नियुक्त करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांना अवनी ग्रामीण ॲप संदर्भातील प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

### दोन वर्षांत साडेचार कोटी घन मीटर गाळ उपसा!

‘गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार’ योजना हा राज्यातील जलसंधारण प्रकल्प आहे. यामध्ये धरणे व तलाव गाळमुक्त करून तो गाळ शेत जमिनीमध्ये टाकण्यात येतो. त्यामुळे जलसाठ्यत वाढ होते आणि जमिनीची सुपिकताही वाढते. गेल्या दोन वर्षात राज्यात दीड हजारपेक्षा जास्त जलस्त्रोतातून सुमारे साडेचार कोटी घनमीटर गाळ काढण्यात आला असून सुमारे चाळीस हजार शेतकऱ्यांनी हा गाळ वाहून नेला आहे.

### ‘गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार’ अभिनव योजना

राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये सुमारे ९ कोटी घनमीटर गाळ उपसण्याची क्षमता असून १.८ लाखांहून अधिक शेतकरी गाळ वाहून नेणार आहेत. हे काम सध्या वेगाने सुरू आहे. ‘गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार’ ही एक अभिनव योजना असून फिलॅन्ट्रॉपीक संस्था, शासकीय विभाग आणि स्थानिक समुदाय यांना एकत्र आणते, हा एक मोठा सहभागात्मक उपक्रम आहे.

# होळीच्या दिवशी पैसे आल्याने लाडक्या बहिणी आनंदी

**पैसे काढण्यासाठी भली मोठी रांग**

**मुंबई :** फेब्रुवारी महिन्यात लाडकी बहीण योजनेचे पैसे न आल्याने बहिणींच्या आनंदावर विरजण पडले होते. त्यातच सरकार हे पैसे कधी देणार, याची चिंता लाडक्या बहिणींना लागून राहिली होती. त्यातच महिला दिनाच्या पूर्वसंध्येला फेब्रुवारी महिन्याचा हप्ता लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा झाल्यानंतर मार्चचे पैसे कधी येणार, असा प्रश्न त्यांना पडला होता. आता मार्च महिन्याचे पैसे बहुतेक बहिणींच्या खात्यात होळीच्या दिवशी आल्याने लाडक्या बहिणींच्या आनंदाला पारावार उरला नाही. त्यातच पैसे काढण्यासाठी ठिकठिकाणी मोठी रांग लागल्याचे दिसून येत होते.

पैसे काढण्यासाठी पोस्ट ऑफिस किंवा बँकांबाहेर महिलांची भलीमोठी रांग लागल्याचे चित्र गुरुवारी दिसत आहे. होळी सणाच्या सणानिमित्त अकाउंटवर आलेले पैसे काढण्यासाठी पोस्ट ऑफिससमोर सकाळपासून महिलांनी गर्दी केली होती. तसेच होळी सणानिमित्ताने योजनेचे पैसे मिळाल्याने महिलांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

महाराष्ट्र सरकारने सुरू केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे फेब्रुवारी आणि मार्च महिन्यातील दुसऱ्या टप्प्यातील पैसे महिलांच्या खात्यावर जमा होण्यास सुरुवात झाली आहे. फेब्रुवारी महिन्याचे पैसे महिला दिनानिमित्त देण्यात आले होते. मात्र दोन महिन्याचे हप्ते एकत्र मिळणार, असे सांगितले जात असतानाच खात्यात केवळ १५०० रुपये जमा झाल्याने महिलांकडून नाराजी व्यक्त करण्यात आली होती. यातच आता बुधवारी आणि गुरुवारी अनेक महिलांच्या खात्यात दुसऱ्या टप्प्यातील पैसे जमा होण्यास सुरुवात झाली आहे.

काही दिवसांपूर्वीच महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी लाडकी बहीण योजनेचे ७ ते १२ मार्चपर्यंत दोन टप्प्यांमध्ये मार्च महिन्याचाही हप्ता दोन्ही महिन्याचे हप्ते दिले जाणार असल्याचे सांगितले होते. सर्व पात्र लाभार्थी भगिनींना फेब्रुवारी व मार्च महिन्याचा सन्माननिधी वितरित करण्याची प्रक्रिया ७ मार्चपासून सुरू झाली आहे, असे तटकरे म्हणाल्या.



### २१०० रुपयांची प्रतीक्षाच

निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र महिलांना प्रत्येक महिन्याला २१०० रुपये देण्याचे आश्वासन महायुतीने जाहीरनाम्यात दिले होते. मुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पाच्या वेळी २१०० रुपये देऊ असे म्हटले होते. मात्र राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी १० मार्च रोजी जाहीर केलेल्या अर्थसंकल्पात २१०० रुपयांविषयी कोणतेही भाष्य केलेले नाही. तसेच पुढील वर्षी केलेली निधीची तरतूद ही फक्त ३६ हजार कोटींची आहे. त्यामुळे सध्या तरी लाडक्या बहिणींना २१०० रुपयांसाठी प्रतीक्षाच करावी लागणार असल्याचे दिसत आहे.

# महाराष्ट्र भूषण पुरस्कार लवकरच जाहीर करणार

**मानवी जीवन उंचावण्यासाठी होणार सन्मान –फडणवीस**

**मुंबई :** कोणत्याही क्षेत्रात निरपेक्ष वृत्तीने सेवा करणाऱ्या तसेच त्याद्वारे मानवी जीवन उंचावण्यासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४ ' साठी राज्यातून प्राप्त शिफारस प्रस्तावातील सर्व मान्यवरांचे महाराष्ट्रासाठी अत्यंत मोलाचे योगदान आहे. 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४' अंतिम निर्णय हा सर्व संबंधितांशी विचारविनिमय करून लवकरच जाहीर करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

विधानभवन येथे 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४' निवड समितीच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड आशिष शेलार, सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी, सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक बिभीषण चवरे, महाराष्ट्र भूषण पुरस्कार निवड समितीचे अशासकीय सदस्य डॉ. अनिल काकोडकर, दूरदृश्यप्रणालीद्वारे महाराष्ट्र भूषण पुरस्कार निवड समितीचे अशासकीय सदस्य अॅड उज्ज्वल निकम, डॉ. शशिकला वंजारी यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र भूषण पुरस्कार हा महाराष्ट्रातील सर्वोच्च नागरी सन्मान असून हा पुरस्कार कोणत्याही क्षेत्रात निरपेक्ष वृत्तीने सेवा करणा-या तसेच त्याव्दारे मानवी जीवन उंचावण्यासाठी उल्लेखनीय कार्य करणा-या व्यक्तीला देण्यात येतो. 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०३४' पुरस्कारासाठी शासनाला प्राप्त शिफारस प्रस्तावापैकी एकाची निवड करणे अत्यंत कठीण काम आहे. पुरस्कार निवड समिती सदस्यांनी सुचविलेली नावे लक्षात घेवून असून लवकरच हे पुरस्कार सर्व संबंधितांशी विचारविनिमय करून जाहीर करण्यात येतील.

# दुष्काळमुक्त महाराष्ट्राचे स्वप्न पूर्ण होणार !

**जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची माहिती**

**मुंबई :** सिंचन विभागामध्ये गोदावरी खोरे, कृष्णा खोरे, तापी खोरे, विदर्भ सिंचन, कोकण खोरे विकास महामंडळाकरिता राज्य सरकार विशिष्ट कालबद्ध कार्यक्रम तयार करून आवश्यक त्यास निधी उपलब्ध करून देईल. त्याचबरोबर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीसुद्धा नदीजोड प्रकल्पाकरिता निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासित केले आहे. यामुळे महाराष्ट्रातील सिंचन प्रकल्प अधिक गतीमान होतील आणि दुष्काळमुक्त महाराष्ट्राचे स्वप्न पूर्ण होईल. असे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधानपरिषदेत सांगितले.

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधान परिषद सदस्य सर्वश्री अभिजित वंजारी, शशिकांत शिंदे, प्रवीण दरेकर, विक्रम काळे, सदाशिव खोत, राजेश राठोड, कृपाल तुमाने, सत्यजित तांबे, शिवाजीराव गर्जे, अमोल मिटकरी, पंकज भुजबळ या सदस्यांनी विधानपरिषद नियम २६० अन्वये भूमिका मांडली. यावर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधानपरिषददेत राज्यातील पाणी व्यवस्थापन, सिंचन प्रकल्प आणि दुष्काळ निवारणासाठी शासनाने हाती घेतलेल्या उपाययोजनांवर विस्तृत माहिती दिली.

सन २००५ च्या समन्यायी पाणी वाटपाच्या कायद्यानुसार २०१३ मध्ये मेंढीगिरी समिती स्थापन करण्यात आली होती. त्यावेळी ६५ टक्के पाणी वाटपाचे धोरण ठरले होते. मात्र, नंतरच्या काळात मेंढीगिरी समितीने पावसप्रमाणे पाणी वापराचे पुनर्लोकन करण्याची शिफारस केली. त्यानुसार, २६ जुलै २०२३ रोजी मांदाडे समितीची स्थापना करण्यात आली आणि त्यांच्या शिफारसीनुसार हे प्रमाण ५८ टक्के करण्यात आले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाला या निर्णयासंदर्भात जनतेच्या हरकती मागवण्याचे निर्देश दिले आहेत. १५ मार्चपर्यंत हरकती प्राप्त झाल्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल.



### जलसंपत्ती वाढवण्याचे प्रयत्न

राज्यातील जलसंधारण व सिंचन प्रकल्पांचा आढावा घेताना सरकारने गोदावरी खोऱ्यातील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ३,४१० कोटी रुपये तर २०२५–२६ साठी २,३७५ कोटी रुपये मंजूर केले आहेत. तसेच, विदर्भातील वैनगंगा–नैनगंगा नदीजोड प्रकल्पासाठी १८,५७५ कोटी रुपये तर कोकण–गोदावरी खोऱ्यासाठी १३,९९७ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

### दुष्काळमुक्त महाराष्ट्राचे उद्दिष्ट

शासनाने सिंचन प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर केला आहे. त्यात कोकण–तापी खोऱ्यात ३४.८० टीएमसी पाणी उपलब्ध करण्याचे सर्वेक्षण सुरू असून, या वर्षी १६० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तसेच, दुष्काळग्रस्त भागातील सिंचन व्यवस्थापन सुधारण्यासाठी जुन्या कालव्यांची दुरुस्ती करण्यासाठीही शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी आहे.

# मालमत्ता कर थकबाकी तब्बल २० हजार कोटींच्या घरात

**पालिकेला आर्थिक तोटा**

**मुंबई :** उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत असलेल्या मालमत्ता कर थकबाकीचा आकडा दिवसेंदिवस वाढत आहे. गेल्या सहा वर्षांत तब्बल २० हजार कोटी रुपये मालमत्ता करापोटी थकित असल्याची माहिती समोर आली आहे. जानेवारी २०२२ मध्ये उद्धव ठाकरे यांनी ५०० चौरस फुटाखालील घरांना कर माफी दिली आणि त्याचा फटका मुंबई महापालिकेला सहन करावा लागत आहे.

दरम्यान, थकीत रक्कम वसुलीसाठी पालिकेच्या कर निर्धारण व संकलन विभागामार्फत प्रयत्न सुरू आहेत. मुंबई महापालिकेने उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत जकात बंद झाल्यापासून मालमत्ता कर उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत आहे. जकात बंद झाल्यापासून जीएसटी म्हणून मुंबई महापालिकेला महिना ९०० कोटी रुपये केंद्र सरकारच्या माध्यमातून पालिकेच्या तिजोरीत जमा होतात. तर दुसरीकडे ५०० चौरस फुटाखालील घरांना कर माफी दिल्याने मुंबई महापालिकेला वर्षाला ४६४ कोटी रुपयांवर पाणी सोडावे लागते. मालमत्ता करातून मुंबई महापालिकेला वर्षाला ६ हजार कोटी रुपयांचा महसूल मिळणे अपेक्षित आहे. मात्र गेल्या काही वर्षांत मालमत्ता कर थकबाकीदारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

### थकबाकीची कारणे

न्याय प्रविष्ट प्रकरणे कर प्रणालीमुळे निर्माण झालेला संभ्रम, कराची थकबाकी, कर देयके देण्यास झालेला विलंब अशा विविध कारणांमुळे मालमत्ता कराची थकबाकी वाढत गेल्याची माहिती कर निर्धारण व संकलन खात्याने दिली आहे.

# रेडिओ क्लब जेट्टीचे नितेश राणेंच्या हस्ते भूमीपूजन

**मुंबई :** ३५० लोकांची क्षमता असलेले ॲम्पीथिएटर, बर्थिंग जेट्टी, अप्रोज जेट्टी सोयीसुविधांसह जेटी असणार आहे. रेडिओ क्लब येथील प्रवासी जेटी टर्मिनल इमारतीचे भूमिपूजन बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. प्रदीप, मुख्य अभियंता सुरेंद्र टोपले, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी प्रदीप बढीये, अधीक्षक अभियंता सुधीर देवरे आदी उपस्थित होते

‘गेट वे ऑफ इंडिया’ येथील अस्तित्वातील जेट्टीवरील सुविधा प्रवाशांसाठी अपुरी पडत असल्याने वृद्ध व्यक्ती, स्त्रीया व लहान मुले यांना अडचणी निर्माण होतात. या प्रस्तावित जेट्टीमुळे गेट वे ऑफ इंडिया येथील जेट्टीवरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे.



**५० लाखांहून अधिक कामगारांची आरोग्य तपासणी - आकाश फुंडकर**

# ‘टेस्ट टू ट्रिटमेंट’ कामगारांसाठी नवसंजीवनी

**मुंबई :** कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून शिक्षण, विवाह, गरोदरपण, आरोग्य तपासणी आणि अपघात सहाय्यता यासारख्या योजना राबवण्यात येतात. त्यापैकी टेस्ट टू ट्रिटमेंट" या योजनेअंतर्गत ५० लाखांहून अधिक कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून गंभीर आजारांसाठी २ लाखांपर्यंत आर्थिक सहाय्य दिले जात असल्याचे कामगार मंत्री ॲड आकाश फुंडकर यांनी विधानपरिषदेत सांगितले.

केंद्र सरकारच्या अधिनियमाच्या अनुषंगाने २००७ मध्ये राज्यात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ स्थापन करण्यात आले. या मंडळाद्वारे जमा होणारा १ टक्का उपकर हा कामगारांच्या कल्याणासाठी वापरण्यात येतो. फेब्रुवारी २०२५ अखेर ५५,९४,३५४ कामगारांची नोंदणी झालेली असून त्यापैकी ३२ लाख बांधकाम कामगार सक्रिय असल्याचे मंत्री ॲड आकाश फुंडकर यांनी सांगितले.

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधानपरिषद सदस्य सर्वश्री अभिजित वंजारी, शशिकांत शिंदे, प्रवीण दरेकर, विक्रम काळे, सदाशिव खोत, राजेश राठोड, कृपाल तुमाने, सत्यजित तांबे, शिवाजीराव गर्जे, अमोल मिटकरी,



पंकज भुजबळ या सदस्यांनी विधानपरिषद नियम २६० अन्वये आपली भूमिका मांडली होती, त्यास मंत्री फुंडकर यांनी उत्तर दिले. कामगार विभागाच्या संदर्भात झालेल्या चर्चेदरम्यान कामगार मंत्री फुंडकर यांनी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या कार्यपद्धतीवर सविस्तर माहिती दिली. त्यांनी मंडळाच्या माध्यमातून कामगारांसाठी राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांची आणि त्यामध्ये होणाऱ्या सुधारणांवर माहिती दिली.

सभागृहात काही सदस्यांनी मंडळामध्ये झालेल्या खर्चाबाबत आणि गैर व्यवहाराबाबत प्रश्न उपस्थित केला. यावर कामगार मंत्री फुंडकर यांनी सांगितले की, सुरुवातीच्या काळात नोंदणी प्रक्रियेमध्ये काही त्रुटी होत्या, मात्र आता संपूर्ण प्रणाली अधिक पारदर्शक करण्यासाठी सुधारणा करण्यात आल्या आहेत. तालुकावार लॉगिन आयडी प्रणाली, ऑनलाइन नोंदणी आणि बायोमेट्रिक व दस्तऐवज पडताळणी यांसारख्या उपाययोजना लागू करण्यात आल्या असल्याचे ही मंत्री फुंडकर यांनी यावेळी सांगितले.

बांधकाम कामगारांच्या कौशल्यवृद्धीसाठी बार बेंडिंग, प्लंबिंग, इलेक्ट्रिशियन, वेल्डिंग यांसारख्या आठ ट्रेडमध्ये १५ दिवसांचे मोफत प्रशिक्षण दिले जात आहे. प्रशिक्षण कालावधीसाठी प्रत्येकी ४२०० रुपये वेतन नुकसान भरपाई आणि प्रशिक्षणासाठी ५८० रुपये शासन देत आहे. त्याचबरोबर कामगारांची नोंदणी अधिक सुलभ करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे.

# ‘मागेल त्याला शेततळे’ योजनेचे अनुदान वाढवण्याचा विचार

**कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांची माहिती**

**मुंबई :** राज्य शासनाने ‘मागेल त्याला शेततळे’ योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना किमान १४,४३३ ते कमाल ७५ हजारापर्यंत अनुदान देण्यात येते. वन विभागाच्या योजनेत तीन लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येते. या पार्श्वभूमीवर शेततळ्याचे अनुदान वाढवण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून तो अंतिम मंजुरीच्या प्रतीक्षेत असल्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी विधानपरिषदेत नियम २६० च्या मांडलेल्या प्रस्तावावर उत्तर देताना सांगितले.

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे,



विधान परिषद सदस्य सर्वश्री अभिजित वंजारी, शशिकांत शिंदे, प्रवीण दरेकर, विक्रम काळे, सदाशिव खोत, राजेश राठोड, कृपाल तुमाने, सत्यजित तांबे, शिवाजीराव गर्जे, अमोल मिटकरी, पंकज भुजबळ या सदस्यांनी विधानपरिषद नियम २६० अन्वये आपली भूमिका मांडली होती, त्यास मंत्री कोकाटे यांनी उत्तर दिले.

राज्यात नमो शेतकरी महासन्मान निधी योजना सुरू असून, याअंतर्गत प्रत्येक शेतकऱ्याला वार्षिक ६ हजार रुपये थेट बँक खात्यात दिले जात आहेत. आतापर्यंत ८,९६१.३१ कोटींची मदत ९०.५ लाख शेतकरी कुटुंबांना वितरित करण्यात आली आहे. ठिबक सिंचन योजना अधिक प्रभावी करण्यासाठी राज्य शासनाने लॉटरी पद्धती बंद करून प्रथम अर्ज, प्रथम प्राधान्य तत्त्व लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

# सरपंच चंद्रकांत भोईर यांच्यासह पीडब्ल्यूडीच्या अधिकाऱ्यांना धमकावून खंडणी मागणाऱ्या सराईत गुन्हेगाराला पनवेल शहर पोलिसांनी केले गजाआड

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

पळस्पे गावचे सरपंच चंद्रकांत भोईर यांच्यासह पीडब्ल्यूडीच्या एका अधिकाऱ्यांना पैशासाठी धमकावून त्यांच्याकडून खंडणी मागणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला पनवेल शहर पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीचा माग काढून त्याचा सहा दिवस पाठलाग करून उत्तरप्रदेश येथून ताब्यात घेतले. पनवेल शहर पोलीस ठाणे येथे तक्रारदार प्रशांत दळवी (पीडब्ल्यूडी स्टोअर मॅनेजर) यांनी तक्रार दिली की कोणीतरी अज्ञात इसम हा त्यांचे तसेच पत्नीचे मोबाईल फोनवर फोन करून " तुम्हाला मारण्याची सुपारी मिळाली असुन सेटलमेंट करण्याकरिता एक लाख रुपये दे नाहीतर तुम्हाला ठार मारून टाकू अशी धमकी दिली असून व्हाट्सअप व्हिडिओ कॉलद्वारे त्याच्याकडील पीस्टल सारखे अग्निशस्त्र व काडतुसे दाखवून सतत पैशाची मागणी करत असल्याबाबत तक्रार दिल्याने पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. त्याचप्रमाणे पळस्पे गावचे सरपंच चंद्रकांत भोईर यांना देखील ते कर्जत जिल्हा रायगड येथे असताना अशाच प्रकारे अज्ञात इसमाने व्हाट्सअप नंबर वरून त्यांना खंडणी देण्याबाबत मेसेज तसेच अग्निशास्त्राचे फोटो पाठवले बाबत तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यास प्राप्त झाल्याने सदर बाबत 00 क्रमांकाने गुन्हा दाखल करून तो पुढील तपास कामी कर्जत पोलीस ठाणे येथे पाठवण्यात आलेला होता. दोन्हीही



गुन्ह्यांच्या तक्रारीचे अवलोकन केले असता त्यातील आरोपीत याने वापरलेला मोबाईल नंबर एकच असल्याचे दिसून आल्याने तसेच आरोपीत हा फिर्यादी यांना व्हाट्सअप व्हिडिओ कॉल करून अग्निशस्त्र दाखवत असल्याचे दिसून आल्याने नमूद गुन्ह्यातील संवेदनशीलता लक्षात घेऊन माननीय पोलीस उपायुक्त परिमंडळ दोन पनवेलचे प्रशांत मोहिते यांनी तात्काळ एक पथक तयार करून गुन्ह्याचा तपास करणेबाबत आदेशित केल्याने नमूद केले. त्यानुसार वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्ह्याचा तांत्रिक तपास केला असता आरोपीचे लोकेशन हे उत्तर प्रदेश येथील बलिया जिल्ह्यात असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे पनवेल शहर पोलीस ठाणे कडील एक तपास पथक त्यामध्ये सपोनि. प्रकाश पवार, पो.हवा.संदेश म्हात्रे, पो.ना.मिथुन भोसले व गुन्हे प्रकटीकरण पथक पनवेल शहर हे तात्काळ उत्तर प्रदेश येथे रवाना झाले. आरोपीचे लोकेशन सतत बदलत असल्याने एसटीएफ युनिट वाराणसी यांची मदत घेऊन सतत तीन दिवस तांत्रिक तपास करून आरोपी ब्रिजेश लाल बहादुर चौहान (22) यास जिल्हा बलिया येथून दुर्गम भागातून ताब्यात घेण्यात आले. आरोपीकडे त्याने गुन्ह्यात वापरलेला मोबाईल क्रमांक व सिम कार्ड मिळून आले असून आरोपी त्यांनी गुन्हा केल्याचे कबूल केलेले आहे. सदरील आरोपी हा स्थानिक पातळीवर जबरी चोरी लूटमार करत असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. आरोपीत यास वेळीच ताब्यात घेतल्याने भविष्यात घडणारा गंभीर स्वरूपाचा गुन्हा प्रतिबंध करण्यात यश आले आहे.

## थोडक्यात


### दिल्ली विधानसभेचे भाजपाचे नवनिर्वाचित आ. व कॅबिनेट मंत्री प्रवेश सिंह वर्मा यांच्यासोबत विधीमान्य चेंबर ऑफ कॉमर्सचे शिष्टमंडळांनी केली विविध विषयांवर चर्चा,

दैनिक युवक आधार
पुणे वार्ताहर

दिल्ली विधानसभेचे भारतीय जनता पार्टीचे नवनिर्वाचित आमदार व दिल्लीचे कॅबिनेट मंत्री प्रवेश सिंह वर्मा यांची दिल्ली येथे विधी मान्य चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री चे चेअरमन व राष्ट्रीय अध्यक्ष जैन सेवा मल्टीपर्पज चॅरिटेबल फाउंडेशनचे प्रवीण ओसवाल यांनी भेट घेऊन व्यापाऱ्यांच्या वतीने विविध विषयांवर चर्चा करण्यात आली व त्यांना विधी मान्य चेंबर ऑफ कॉमर्सचे डायरी भेट देण्यात आले,

यावेळी मनमोहन ठाकूर उपाध्यक्ष विधीमान्य चेंबर ऑफ कॉमर्स, आदि यावेळी उपस्थित होते

यावेळी कॅबिनेट मंत्री प्रवेश सिंह वर्मा यांनी चर्चेच्या दरम्यान विधी मान्य चेंबर ऑफ कॉमर्स चे भरभरून कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिले,



### पुरातन शिवमंदिर तोडल्याने कारवाईसाठी उपोषण सुरु.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी. गौरव खरे**
**मुरबाड .**

मुरबाड तालुक्यातील प्रसिद्ध असलेल्या काळू डोईफोडी या नदयांच्या संगमावर वसलेले दोनशे वर्षांपूर्वी चे शिवमंदिर महाशिवरात्री पूर्वी तोडल्याने भक्तांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. याबाबत पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी काम सुरु केल्याचे सांगुन कार्यकारी अभियंता यांच्याकडून कोणत्याही कार्यरंभ आदेश नसताना व पुरातत्व खात्याशी मंदिर तोडण्याची परवानगी नसताना हे शिवमंदिर तोडल्याने तोडणाऱ्यावर कारवाइ करावी या मागणीसाठी तहसीलदार कार्यालयासमोर शरद पाटील शिवभक्तांसह उपोषणास बसले आहेत. याबाबत त्यांनी मा. तहसीलदार मुरबाड यांना पत्र सुद्धा दिले आहे. मंदिर तोडणाऱ्यावर जोपर्यंत कारवाइ होत नाही तोपर्यंत उपोषण करणार असल्याचे सांगितले.




### सात वर्षीय सय्यद अरशीन चा आयुष्यातील पहिला रोजा पुर्ण

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)**

- मुस्लिम समाजाचा पवित्र रमाजान महिना या वर्षी मार्च महिन्यात आला असुन राज्यात उन्हाची तिव्रता वाढली आहे. या उष्ण वातावरणात पिण्याच्या पाण्यासाठी घश्याला कोरड पडु लागली आहे. तरी ही मुस्लिम समाजातील नागरीक व लहान मोठी मुले अन्न पाण्याचा त्याग करुन मानवतेच्या सुखासाठी दिवस भर ईश्वराप्रती उपवास करुन अल्लाहची कृतज्ञता व्यक्त करतात. पाटोदा येथील



जेष्ठ समाजवादी नेते दलित मित्र कॉ.इकबाल पेटंर यांचे जेष्ठ चिरंजीव विश्वास खतीब याची नात अरशिन इमरान वय ७ वर्षे या चिमकुलीने आयुष्यातील पहीला (उपवास) रोजा उत्साहात पुर्ण केला. पाटोदा शहरातील क्रांतीनगर भागातील गुलजारपुरा मस्जिद येथे कॉ.इकबाल पेटंर यांच्या कुटूंबीयाच्या वतीने (उपवासक) रोजादार भक्तांना सामुदायिक इफ्तार व जेवणाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमास क्रांतीनगर भागातील व पाटोदा शहरातील मान्यवरांनी उपस्थित राहून उपवासक(रोजादार) अरशीनला शुभेच्छा देऊन कौतुक व पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. सर्व हिंदू मुस्लिम बांधवाचे सय्यद परिवाराच्या वतीने इमरान सय्यद यांनी आभार व्यक्त केले आहे.

# म्हसावद थेपडे विद्यालयात परसबाग स्वच्छता उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी**
**समाधान पाटील**

जळगाव तालुक्यातील म्हसावद येथील थेपडे माध्यमिक विद्यालयात मुख्याध्यापक पी डी चौधरी सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयात छान परसबागेची निर्मिती केलेली असून परसबागेत कांदे, गिलकी,मिरची, वांगी, कोथिंबीर,भेंडी इत्यादी पिकांची लागवड करण्यात आलेली आहे. परसबागेतून निर्मित वांगे ,टमाटे, कोथिंबीर यांचा वापर अधून मधून शाळेच्या बोर्डिंगच्या विद्यार्थ्यांच्या भोजनात आणि शालेय पोषण आहाराच्या मेन्यूमध्ये केला जातो. परसबागेतील पिकांची निगा राखणे, त्यांना पाणी देणे, निंदणी करणे इत्यादी कामे विद्यार्थी नियोजनाप्रमाणे करतात. नियोजनाप्रमाणे नेमून दिलेल्या विद्यार्थिनी नियमितपणे परसबागेची स्वच्छता करीत असतात. परत बागेत काम करताना आम्हाला आनंद मिळतो अशी भावना विद्यार्थिनींनी मुख्याध्यापक पी डी चौधरी सर यांच्याजवळ व्यक्त केली. नागदुलीचे शेतकरी श्री सुनील तुकाराम माळी यांनी परसबागेसाठी वांग्यांची रोपे दिली. तसेच सचिन चव्हाण सर आणि एस सी बाविस्कर सर यांनी टमाट्यांची रोपे दिली. विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी परसबागेची निगा राखण्यास मदत करतात.





## लक्षवेधी छायाचित्र

दैनिक युवक आधार-
विद्यार्थी संदेश...
नैसर्गिक रंग लावूनिया खेळू होली !
पर्यावरण व आरोग्याची करूया बोली !!
छायाचित्र :- प्रदिपगुरुजी पिंपळनेरकर
( छ. संभाजीनगर९८२३११३५९४)

# घे भरारी महिला ग्रुप तर्फे रांजणखार येथे जागतिक महिला दिन संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**अलिबाग प्रतिनिधी,**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून घे भरारी ग्रुप रांजणखार यांच्या प्रयत्नातून दिनांक ८ मार्च २०२५ शनिवार रोजी रांजणखार गावामध्ये महिलांसाठी विविध मनोरंजक स्पर्धांचे तसेच यशस्वी १० वी १२वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी गावातील सन २०२४ ते २०२५ या वर्षात देवाज्ञा झालेल्या ग्रामस्थांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सदरील या कार्यक्रमासाठी भारत भूषण पुरस्कार प्राप्त तसेच तेजस्विनी फाऊंडेशन संस्थापिका अड. जिविता सूरज पाटील या प्रमुख व्याख्याता म्हणून उपस्थित राहिल्या. यावेळी चिंचवली ग्रामपंचायत सदस्य राजेश विद्याधर म्हात्रे, ग्रामस्थ विजय बलराम म्हात्रे, सत्यवान पाटील, मधुकर पाटील, विलास म्हात्रे, रत्नाकर पाटील इ . मान्यवर उपस्थिती होते. यावेळी आपल्या मार्गदर्शनात अड जिविता पाटील यांनी महिलांना मोलाचे मार्गदर्शन करीत असताना आज २१ व्या शतकातील प्रगतीच्या युगातही ग्रामीण भागातील काही ठिकाणी आजही महिलांनी फक्त चूल आणि मूल यामध्येच स्वतःला अडकवून ठेवले आहे त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महिलांनीच प्रयत्न केले पाहिजेत. त्यांच्या अंगी असणाऱ्या कलागुणांना स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध करून देऊन त्यांना स्वतः च्या पायावर सक्षमपणे उभे रहाण्यासाठी शिक्षणा सोबतच इतर कलाकौशल्यांना विकसित करणे आवश्यक असून महिलांनी स्वतःला सिद्ध केले पाहिजे तरच खऱ्या अर्थाने महिला दिनाचे सार्थक होईल असे मत व्यक्त केले. यावेळी रांजणखार गावातली कृतिका पाटील हिने हिरकणीचा सुंदर प्रसंग सादर करून उपस्थितांची मने हेलावली. स्पर्धांमध्ये यशस्वी झालेल्या महिलांना मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले. एकंदरीत हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी घे भरारी महिला ग्रुप प्रमुख कांचन म्हात्रे, वृषाली म्हात्रे, श्रुतिका पाटील,निशा पाटील, विश्रांती पाटील, रुपाली पाटील, निलिमा पाटील, रुचिता म्हात्रे, मानसी पाटील, स्वेतली पाटील, अर्चना म्हात्रे या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कांचन मच्छिंद्र म्हात्रे व अर्पिता (सुतरपाडा) हिने अतिशय सुंदर पद्धतीने केले.





# "जलतारा योजनेसाठी व फार्मर आयडी साठी रिठद येथे शेतकऱ्यांची बैठक"

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी**
**रणजीत सिंह ठाकुर**

आज दिनांक १३ मार्च २०२५ रोजी सायंकाळी पाच वाजता ग्रामपंचायत कार्यालय रिठद येथे जिल्हाधिकारी भुवनेश्वरी एस व प्रतीक्षा तेजनकर तहसीलदार रिसोड यांच्या आदेशान्वये रिठदचे मंडळ अधिकारी पडवे यांच्या मार्गदर्शनाखाली तलाठी रूपाली संत्रे व कृषी सहाय्यक अनिल इंगोले यांचे उपस्थितीत ग्रामपंचायत मध्ये जलतारा योजने संदर्भात सर्व शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली व त्याबाबत निसर्गाचे निसर्गपण जोपासण्यासाठी व उष्णतेचा पारा दरवर्षी वाढत चालला ती उष्णता थांबवण्यासाठी जलतारा योजना राबवणे गरजेचे आहे. सर्व शेतकऱ्यांनी जलतारा योजना राबवावी.यासाठी कृषी सहाय्यक अनिल इंगोले यांनी याबाबत मार्गदर्शन केले. व यासाठी सर्व शेतकऱ्यांनी सहकार्य करावे या जलतरा योजनेमध्ये अल्पभूधारक शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा व जास्त जमीन असलेल्या शेतकऱ्यांनी सुद्धा स्वतःहून जलतरासारख्या योजना शेतामध्ये राबवल्या तर जगात उष्णतामान वाढणार नाही. याबाबतची प्रत्येक शेतकऱ्याने काळजी घेणे गरजेचे आहे. तसेच प्रत्येक शेतकऱ्यांने फार्मर आयडी काढून घ्यावी.त्याशिवाय काही योजनेच्या लाभापासून शेतकऱ्याला वंचित राहावे लागेल व तशी वेळ शेतकऱ्यांनी स्वतः वर येऊ देऊ नये.असे आवाहन यावेळी तहसील कार्यालय व कृषी विभाग यांच्याकडून सामुहीक



रित्या करण्यात आले.यावेळी उपस्थितामध्ये ग्रामविकास अधिकारी मोहन भुसारी, प्रल्हाद अंभोरे, नारायण आरु, गंगाधर आरु, गजानन बोरकर रोजगार सेवक,लोडजी आरु,आश्रु आरु, प्रल्हाद आरु, गंगाधर बोरकर, गणेश बोरकर, उत्तम आरु संतोष अंभोरे, इत्यादी शेतकरी मार्गदर्शन ऐकण्यासाठी यावेळी उपस्थित होते

## होळी

होळीत भस्म व्हाव्या, क्रूर प्रथा या जगाच्या
राख होऊन उराव्या, व्यथा अतृप्त मनाच्या

गवरी घ्यावी द्वेषाची, वैरभावनेची ती लाकडं
स्थिर व्हावी चंचल मनीची,खोडकर ती माकडं

दुर्बुद्धीच करून नारळ, आहुती द्यावी आज
कापूर सुगंध भरो,नष्ट करो वागण्यातील माज

निखाऱ्यावर शिजवून घ्यावी,गोड स्वभाव खीर
ज्ञानप्रकाश पसरो चहूकडे, मिटावा अज्ञान तीमिर

दु:ख जावे उंच गगनी, भस्म व्हावा हा अधर्म
सद्‌बुद्धी मिळो जगा, कळावे जीवनाचे मर्म

बंधुभाव अन् एकात्मता,मानवतेचे हेच प्रतीक
सुख दडले परोपकारी,दु:ख मूळ इच्छा भौतिक

महापुरुषांचे चरित्र आचरू,जीवन होई सुवर्ण खान
चरणी नतमस्तक होऊ,एकु उपदेश होऊन लहान

सारे मिळून आपण आज, पेटवूया खरी होळी
जगात नांदो सौख्य सदा, मनीच्या दुर्गुनास जाळी

दैनिक युवक आधार
पवन श्रीरंगसा कुसुंदल,नांदेड
संपर्क:९०७५५९५६९५

# पाणी टंचाईवर मात करताना टँकरमधील पाणी नक्की येते कुठून ? विषय संशोधनाचा

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

उन्हाळा सुरू होताच उरणसह संपूर्ण रायगड जिल्ह्यात पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर बनतो. अनेक ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो, मात्र हे पाणी नेमके कुठून आणले जाते? त्याच्या शुद्धतेची खात्री आहे का? बाबत कोणीच स्पष्ट उत्तर देऊ शकत नाही. त्यामुळे हा संशोधनाचा विषय बनला आहे.शहर व ग्रामीण भागात पाणीटंचाई वाढल्यावर स्थानिक नागरिकांना टँकरवर अवलंबून राहावे लागते. मात्र, हे टँकर कोणत्या विहिरीतून, तलावातून किंवा बेकायदेशीर बोअरवेलमधून पाणी भरतात, यावर कोणतेही ठोस नियंत्रण नाही. काही ठिकाणी नगरपरिषदेच्या जलस्त्रोतांवरूनच टँकरद्वारे पाणी घेतले जाते, तर काही ठिकाणी खासगी विहिरी आणि झरेचे पाणीया साठी वापरण्यात येते, त्यामुळे टँकरच्या पाण्याचा स्त्रोत नेमका कोणता आहे? हे सामान्य जनतेला समजतनाही. टँकरद्वारे पुरवले जाणारे पाणी शुद्ध आहे की नाही, याची तपासणी करण्यासाठी कोणतीही ठोस यंत्रणा नसल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. पाण्याची गुणवत्तातपासली जात नाहीयामुळे प्रशासनाची उदासीनता उघड होत आहे. काही ठिकाणी गढूळ आणि दूषित पाणीपुरवठ्याच्या तक्रारीही येतात. मात्र, स्थानिक प्रशासनाकडून यावर योग्य प्रमाणात लक्ष दिले जात नाही. काही ठिकाणी टँकर व्यावसायिक स्वतःच्या पद्धतीने पाणी उचलून विकतात, त्यामुळे हे पाणी कायदेशीररित्या मिळवले जाते की बेकायदेशीरपणे उचलले जाते, हा देखील महत्त्वाचा प्रश्न आहे. स्थानिक प्रशासन आणि पाणीपुरवठा विभागाने यावर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे, अन्यथा नागरिकांना आरोग्याच्या दृष्टीने गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल पाणीटंचाईच्या समस्येवर मात करण्यासाठी प्रशासनाने टँकरद्वारे पुरवठा होणाऱ्या पाण्याच्या स्त्रोतांची नोंद ठेवली पाहिजे, त्याच्या गुणवत्तेची तपासणी केली पाहिजे आणि नागरिकांना सुरक्षित पाणी मिळेल याची खात्री केली पाहिजे. अन्यथा, भविष्यात या टँकरमधील पाणी आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते.

काही ठिकाणी टँकर व्यावसायिक स्वतःच्या पद्धतीने पाणी उचलून विकतात,



त्यामुळे हे पाणी कायदेशीररित्या मिळवले जाते की बेकायदेशीरपणे उचलले जाते, हा देखील महत्त्वाचा प्रश्न आहे. स्थानिक प्रशासन आणि पाणीपुरवठा विभागाने यावर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे, अन्यथा नागरिकांना आरोग्याच्या दृष्टीने गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल पाणीटंचाईच्या समस्येवर मात करण्यासाठी प्रशासनाने टँकरद्वारे पुरवठा होणाऱ्या पाण्याच्या स्त्रोतांची नोंद ठेवली पाहिजे, त्याच्या गुणवत्तेची तपासणी केली पाहिजे आणि नागरिकांना सुरक्षित पाणी मिळेल याची खात्री केली पाहिजे. अन्यथा, भविष्यात या टँकरमधील पाणी आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते.

# संदिप मानकर यांना 15 मार्च रोजी दिला जाणार

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी**
**ज्ञानेश्वर कुं निकाळजे**
**वरूड / जाफ्राबाद**



आपल्या लेखणीतून आदर्श पत्रकारितेच्या माध्यमांतून विविध प्रश्न सोडविणारे व आपल्या उल्लेखनीय सामाजिक कामगिरीच्या बळांवर अल्पावधीतच नावलौकिक झालेले पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते श्री.संदिप मानकर यांना माणुसकी रुग्णसेवा समूह घाटी रुग्णालय व सु-लक्ष्मी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने व संस्थेच्या आठव्या वर्धापन दिनानिमित्त दिला जाणारा राज्यस्तरीय "सेवागौरव पुरस्कार" नुकताच काही दिवसांपूर्वी जाहीर झाला असून या पुरस्काराचे वितरण ता.15 मार्च रोजी छत्रपती संभाजीनगर शहरातील मौलाना आझाद संशोधन केंद्र या सभागृहात विविध मान्यवरांच्या हस्ते केले जाणार आहे. याप्रसंगी सुप्रसिद्ध विनोदी अभिनेते प्रकाश भागवत, पोलीस उपायुक्त नितीन बगाटे, आर्यव्रत इंटरनॅशनल विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.प्रकाश करमाडकर, गेवराई तहसीलचे नायब तहसीलदार संजय सोनवणे, महानगरपालिका उपायुक्त श्रीमती नंदा गायकवाड, सप्तखंजेरी वादक पंकजपाल राठोड महाराज, कीर्तनकार ह.भ.प.विजय गवळी, समाज प्रबोधनकार शामकुमार वानखेडे, माणुसकी समूहाच्या संस्थापिका मिराबाई पंडीत, समाजसेवक सुमित पंडित, पुजा पंडित आदीं मान्यवरांची उपस्थिती राहणार असून मानकर यांना सदरील "राज्यस्तरीय सेवागौरव पुरस्कार" जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्वच स्तरांतून अभिनंदन केले जात आहे.



## रिसोड येथे मान्सूनपूर्व आपत्ती व्यवस्थापन व उष्मलाट कार्यक्रम प्रशिक्षण संपन्न

**दैनिक युवक आधार**
**रणजीत सिंह ठाकुर**

**रिसोड** ; वाशिम जिल्हाधिकारी एस बुवनेश्वरी मॅडम यांच्या आदेशानुसार निवासी उप-जिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे सर यांचे नेतृत्वात आज 12 मार्च 2025 रोजी तालुका स्तरावर आपत्ती व्यवस्थापन पुर्ण तयारी,त्यावर उपाययोजनांबाबत करावयाच्या कार्यवाही तसेच पूर,विज,आग,भूकंप,भुसख्खन,रस्ते अपघात,सर्पदंश, उष्मलाट व जलतारा या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षस्थानी मा. तहसीलदार गजानन जवादे हे होते तर प्रमुख अतिथी श्री. जि.आ.व्य.अ.शाहु भगत साहेब, श्री कुळमेथे सर नायब तहसीलदार महसूल यांची प्रमुख उपस्थिती होती उद्घाटन प्रसंगी नायब तहसीलदार श्री कुळमेथे सर यांनी मार्गदर्शन केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहु भगत यांनी केले सदर प्रशिक्षणाचे मार्गदर्शक आजचे प्रशिक्षक दिपक सदाफळे [जिवरक्षक] प्रमुख मानव सेवा आपत्ती व्यवस्थापन फाऊंडेशन संचालित संत गाडगे बाबा आपात्कालीन शोध व बचाव पथक पिंजर जि.अकोला यांनी पुर,आग,प्रथमोपचार,रस्ते आणी ईतर अपघात,विज, सर्पदंश,आपत्ती व्यवस्थापन आणी शोध व बचाव या विषयांवर योग्य मार्गदर्शन करुन प्रशिक्षण देऊन प्रात्यक्षिके करुन दाखविले. पर्यावरण जलसंधारण या विषयावर मा.पवन भाऊ मिश्रा तसेच प्रा.राजाभाऊ गोरे सर यांनी सर्पदंश या विषयावर तर परिवहन विभागाचे वाहतुक निरिक्षक आ.प्र.काळे सर यांनी एसटी अपघात या विषयावर तर,सुनिल इंगळे समन्वयक यु.रु.अ.वाशिम यांनी बाल विवाह अभियान या विषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले.या प्रशिक्षण कार्यक्रमाला तालुका स्तरावरील अधिकारी,तसेच नायब तहसीलदार तुळशीराम कुळमेथे सर,अनंता रोकडे स.म.अ.रीसोड,सुधाकर पडघान सा.म.अ.,आशिष सावंगेकर ग्रा.म.अ.रीसोड, कार्यक्रमाचे संचालन धनंजय काष्टे ग्रा.म.अ. यांनी केले सास चे शाम सवाई तसेच सरपंच,मंडळ अधिकारी ग्रामसेवक, तलाठी,कृषि सहाय्यक,पोलिस कर्मचारी, मुख्याध्यापक, आरोग्य सेवक/ सेविका,अंगनवाडी सेविका, आशा वर्कर,कोतवाल, रोजगार सेवक,उमेद अभियान व्यवस्थापक,रोजगार हमी योजनेच्या विभागातील कर्मचारी व इतर विभातील कर्मचारी यांची बहुसंख्येने उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी रीसोड तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच मानव सेवा आपत्ती व्यवस्थापन फाऊंडेशनच्या सर्च अण्ड रेस्क्यु टीम चे अंकुश सदाफळे,शेखर केवट,अतुल उमाळे,अश्विन केवट,शुभम भोपळे, विष्णु केवट,यांनी अथक परिश्रम घेतले.



# प्रधान महाविद्यालयात महिला स्वसंरक्षणात्मक शिबीर संपन्न; ९८विद्यार्थिनींनी घेतला सहभाग

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे : महेंद्र माने**

को.ए.सो. बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलनातील आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयाच्याअंतर्गत मूल्यमापन कक्ष , महिला विकास कक्ष आणि मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी प्रगती विभागाच्या संयुक्त जागतिक महिला दिनाचे औचित्त साधून विद्यार्थिनींसाठी एक दिवसीय स्वसंरक्षणात्मक शिबीर प्राचार्य दिनेश भगत यांच्या अध्यक्षतेखाली को.ए.सो प्रशासकीय अधिकारी डॉ. संदेश गुरव,ए.एस.आय.प्रमोद कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला.यावेळी गुन्हा शाखेचे विनोद पाटील,स्थानिक समिति सदस्या अड. सोनल जैन,अग्रवाल विद्यामंदिर मुख्याध्यापिका राधिका ठाकूर,महिला पोलिस प्रीती ओमले,मनीषा भोईर,डॉ.



श्रीकृष्ण तुपारे, डॉ. विजय चव्हाण,डॉ. विलास जाधवर,डॉ.मनोहर शिरसाठ, डॉ. विकास शिंदे, हेमंत जाधव,दीपक दाभाडे,साहिल घरत,शिवानी कामथे,श्रेया पुंडकर यांच्यासह शिक्षक विद्यार्थिनी उपस्थित होत्या. दीप प्रज्वलानंतर मुलींचे एकपात्री प्रयोग सादरीकरणात श्रावणी मरवडे व कोमल म्हात्रे यांनी अनुक्रमे जिजाबाई व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या भूमिका सादर केल्या.यावेळी प्रमोद कदम आणि दामिनी पथकाच्या प्रीती ओमले यांनी मुलींना स्वसंरक्षणात्मक प्रात्यक्षिके, सायबर सिक्युरिटी महत्त्व सांगितले.त्यानंतर झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात डॉ.दिनेश भगत यांनी आई बद्दलच्या भावना, तिचे आयुष्यातील महत्त्व हे विद्यार्थिनींना समजावून सांगून स्त्रीला अष्टभुजा संबोधुन तिच्या कार्यांचा गौरव केला.डॉ.संदेश गुरव यांनी देखील महिला दिनानिमित्त मुलींना आहार व संरक्षण विषयक मार्गदर्शन केले.प्रमोद पाटील यांनी स्त्रियांचे महत्त्व आणि त्यांचे दररोजच्या जीवनात होणारी मदत त्यांच असामान्य कार्य हे समजून सांगितले. विनोद पाटील यांनी मुलींना स्वतःच्या सुरक्षेबाबत सतर्क राहण्याची महत्वपूर्ण सूचना केली. प्रा. मेघना म्हात्रे त्यांनी स्त्री पुरुष समानतेबाबत विविध व्याख्या, उदाहरणे दिली.प्रा.नेहा हेलगे यांनी महिला सुरक्षेसाठी असणारे मोबाईल मधील विविध सुरक्षा अप जसे 24x7 अप ,किंमत अप ,सेफ्टी पिन अप ,डायल वन वन टू अप ही अप्स मुलींना मोबाईलवर प्ले स्टोअर डाऊनलोड करून दिले व त्यांची कार्यप्रणाली समजावून सांगितली. यावेळी राधिका ठाकूर तसेच अझल्फा अजगर सय्यद यांनीही महिला दिना विषयी आपले विचार मांडले.यावेळी महाविद्यालयाच्या वतीने उपस्थित मान्यवत व नागोठणे येथील खारघर पाककला स्पर्धा 2025 च्या विजेत्या सेजल खराडे यांना फुले व कॉलेज स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सदरील शिबिराचा 98 विद्यार्थिनींनी लाभ घेतला असून सर्व विद्यार्थिनींना प्रशस्ती पत्रक देण्यात आले. सदरील प्रशिक्षण शिबिराच्या यशस्वीतेसाठी महिला विकास पक्षप्रमुख डॉ.स्मिता चौधरी,प्रा.प्राची देशपांडे, प्रा. चैत्राली पाटील, प्रा.तृप्ती बोरकर, प्रा.प्रतीक्षा म्हात्रे,प्रा.ऋतुजा करजेकर, प्रा.पल्लवी चव्हाण,ज्योती म्हात्रे यांनी विशेष परिश्रम घेतले केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.राणी ठाकरे यांनी केले.तर आभार प्रदर्शन श्रावणी मांडवकर हीने केले.

## पेण कोळीवाड्यातील गंगनचुंबी होळी नागरिकांचे खास आकर्षण

**दैनिक युवक आधार**
**पेण प्रतिनिधि**
**किरण बांधणकर**

कोकणात सध्या गावाकडे ठिकठिकाणी होळीचा सण साजरा करण्यासाठी जोरदार तयारी सुरू झाली आहे. कोळी समाज बांधवांचा हा आवडीचा सण आहे. या सणाची पूर्व तयारी म्हणून जंगलातील उंच अशा सावरीच्या झाडांची निवड करुन ती होळी वाजत गाजत कोळीवाड्यात आणली जाते.कोळी समाज बांधव हा पाच दिवसांचा होळीचा सण साजरा करतात. पेण कोळीवाड्यात समाजबांधवांनी सजवून ४० फूट उंच होळी उभारणी केली असून पौर्णिमेच्या दिवशी १३ मार्च रोजी कोळीवाड्यात पारंपरिक वेशभूषेत कोळी समाज बांधव नटूनथटून होळीचा सणाचा आनंद उत्साहात साजरा करण्यात आघाडीवर असणार आहेत. आकाशाला भिडणारी ही उंच होळी पहावयास पेण शहरात नागरिकांची मोठी गर्दी उसळते हे या सणाचे वैशिष्ट्य आहे. सध्या ऋतू चक्रात वसंतोत्सव सुरू झाला आहे. निसर्गाच्या सृजनशीलतेशी एकरुप असलेल्या



सणापैकी होळीचा सण साजरा करण्यात येतो. त्याला शिमगा होळीकोत्सव हुताशनी पौर्णिमा अशा नावाने ओळखले जाते. होळी हा खरेतर पृथ्वी आप तेज वायू, अवकाश या पंचमहाभूतांशी संवाद साधला जाणारा सण आहे. कारण माणूस हा सदैव निसर्ग पूजक राहिला आहे. निसर्गातील चराचरात वावणा-या वृक्षवल्ली, प्राणी, पशूपक्षी डोंगर पठार नद्या समुद्र यांच्या सहवासात मानवी जीवन विकसीत झाले आहे. ऋतू बदलाचे उत्सव मानवाने साजरे करण्यात आनंद मानला.होळी हा असाच उत्सव मानव लोक परंपरेनुसार साजरा करीत आहे. हिवाळा संपताच पूर्वापार वाळलेली लाकडे गोळा करून ती पेटवून उब मिळवणे ही मानवी सवय ती आवड व संरक्षण होती. यात त्या पेटलेल्या आगीभोवती फेर धरुन नृत्य करणे लोकगीते गाणी गाणे , चेष्टा मस्करी, बोंबा मारणे अशा संवादाची उधळण करीत. यानंतर काळाओघात ऋतू चक्रात वसंतोत्सव सुरू झाल्यानंतर पौर्णिमेच्या दिवशी होळीचा सण साजरा करण्याची प्रथा सुरू झाली ती आज आधुनिक काळात ही हौसेने सुरू आहे. पेण कोळी समाज हा दर्यावर्दी समाज आहे. नारळी पौर्णिमा आणि फाल्गुन मासातील पौर्णिमा हे दोन सण कोळी बांधव नटूनथटून उत्साहाने साजरे करतात. पाच दिवस विविध कार्यक्रम आयोजित करुन विशेषतः नाच गाणी आणि पारंपरिक वेशभूषेत एकमेकांशी चेष्टा मस्करी करुन निखळ मनोरंजन करणे पुरणपोळी लाडू करंज्या आणि शंकरपाळ्या हे गोडधोड पदार्थांची लज्जत व नैवैद्य होळी समोर दाखवून पौर्णिमेच्या रात्री उशिरापर्यंत नाचगाणी सादर करुन होळी पेटवली जाते.आणि बोंबाबोंब केली जाते. वर्षभरातील अनिष्ट विचार प्रथा यांची होळी करुन सुसंस्कृत जीवन जगणे हाच या सणाचा खरा उद्देश व आनंद आहे. गावोगावी प्रत्येक समाजातील समाजबांधव होळी उभारणी करुन आनंदाने नाचत गात होळीचा सण साजरा करतात.

## महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती निमित्ताने महापालिकेत अभिवादन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**



पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात दि 12 मार्च रोजी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती निमित्ताने आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहारअर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.Udet; nonihilin Itatuam

## उरण तालुक्यातील मोठी जुई गावात समाजकंटकांनी शेत तळी मधील मच्छी पाण्यात केमिकल टाकून मारली.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण / प्रतिनिधी**

समाजकंटक म्हणजे समाजाचे शत्रू ,वैरी ,अपप्रवृत्तीचे लोक अशा लोकांच्या डोक्यात चांगले विचार कधीच येऊ शकत नाही. ते नेहमी समाजाला उपद्रव देतात काही ना काही समाजाला नुकसान होईल असे वर्तन करीत असतात.



अशीच एक घटना उरण तालुक्यातील मोठी जुई गावात दिनांक १२ मार्च रोजी मोठी जुई गावातील शेतकरी संतोष पुंडलिक भगत यांच्या शेततळी मध्ये काही नतदृष्ट समाजकंटकांनी शेततळीमध्ये विषारी केमिकल टाकल्यामुळे त्यातील मच्छी मृत झाली आहे.गावातील गावकरी वर्षभर आपली शेततळी मेहनत घेऊन त्यांचा सांभाळ करत असतात, पावसाळी मच्छींची प्रजाती सोडली जाते. जिताडी, चिंबोरी, इंग्लिश मासे यांसारख्या जातीची मच्छी सोडली जाते. आणि ती वर्षभर त्या मच्छीला जिवापाड जतन करून तिच्यासाठी ती मोठी होण्यासाठी उत्तम प्रकारे देखभाल केली जाते. तिचे पालन पोषण करून ती मच्छी मोठी केली जाते आणि वर्षाच्या होळीच्या सणानिमित्त ती मच्छी धुळीवंदनाच्या दिवशी आपल्या मित्र, आप्तेष्टांना, नातेवाईकांना ही मच्छी भेट या स्वरूपात दिली जाते अशा या मच्छीला वेगळीच चव असते त्यामुळे या मच्छीचे त्या दिवसाला. वेगळेच महत्त्व असते. दिनांक १२ मार्च रोजी रोजी रात्रीच्या सुमारास हा प्रकार झाला आहे. जुई गावातील संतोष भगत या शेतकऱ्यांची शेतावर असलेली शेततळ्यातील मच्छी कोणते तरी विषारी औषध, केमिकल टाकून जाणीवपूर्वक मारण्यात आली आहे . शिजलेल्या भातात मिक्स करून त्यात औषध टाकून तो भात या मच्छीला खाण्यासाठी पाण्यात टाकण्यात आला आणि तो भात खाल्ल्यामुळे या शेततळ्यातील मच्छी गतप्राण झाली आहे. या अगोदरही आठ दिवसांपूर्वी गावात नाईट मॅचेस चालू होत्या क्रिकेटच्या त्यावेळीही हाच प्रकार झाला होता पण त्या वेळेला कमी प्रमाणात मच्छी मारण्यात आली होती पण रात्री या शेततळ्यातील संपूर्ण मच्छी मारण्यात आली आहे .त्याच्यामुळे शेततळी तील पाणी पूर्ण दूषित झाले आहे. आणि या पाण्याला विशिष्ट प्रकारचा वास येत आहे.येथील शेतकऱ्यांनी एवढी मेहनत घेऊन मच्छी वाढवली आणि त्याचा कोणताही या शेतकऱ्याला फायदा न होता याउलट नुकसान झाले आहे. मग शेवटी जड अंत करणाने त्यांनी ही आपली मच्छी आपल्या शेतातील एका नारळाच्या झाडाखाली खड्डा खणून ती पुरण्यात आली आहे. हे कृत्य कोणी केले आहे हे अद्यापही समजले नाही.पण समाजातील अशा समाजकंटकांना शिक्षा झाली पाहिजे. म्हणजे पुन्हा कधी अशी घटना होणार नाही असे बोलले जात आहे.

# महाबोधी महाविहार मुक्तीसाठी भारतीय बौद्ध महासभा मंठा वतीने धरणे आंदोलन

**{ जागे व्हा बिहार सरकार जागे व्हा प्रा.सोणाजी कामिठे अन्यथा आंदोलन तीव्र करू }**

**दैनिक युवक आधार**
**मंठा प्रतिनिधी .**
**नामदेव मंडपे जालना**

बुध्दगया महाबोधी महाविहार म्हणजे भारत देश नव्हे तर जगभरातील बौद्धांचे श्रध्दास्थान असून व्यवस्थापन बौध्दांच्या ताब्यात द्यावे ासाठी भारतीय बौद्ध महासभा प्रा.सोणाजी कामिठे याच्या अध्यक्ष ते मध्ये वतीने आंदोलन करून बुद्धगया येथील महाबोधी महाविहार गैरबौध्दापासून मुक्त करावे या प्रबंधन बौद्धाकडे सोपवण्यात यावे १९४९ चा बुद्धगया मंदिर कायदा बंद मागण्यासाठी मंठा तालुक्यातील सर्व बौद्ध उपासक उपासिका भारतीय बौद्ध महासभा शाखा मंठा वतीने धरणे आंदोलन (दि.१२) रोजी करण्यात आले. मंठा तालुक्यातील संपूर्ण समाज बौद्ध बांधव पक्ष हेवेदावे बाजूला सारून छत्रपती संभाजी महाराज चौक मुख्य रस्त्या मार्गाने शांतता रॅलीमध्ये वर्तमान आणि भविष्याची आवाज प्रेरणास्थळ डॉ. बाबासाहेब



आंबेडकर यांच्या स्मारकाला अभिवादन करून रयतेची जाणते राजे छत्रपती शिवाजी महाराज यांना वंदन करून रॅलीचे रूपांतर धरणे आंदोलनात झाले यावेळी उपस्थित त्यांना संबोधित करताना पूज्य भदंत डि.शिलरत्न थेरो यांच्या उपस्थितीमध्ये प्रचंड अक्रोश निदर्शने करण्यात आले. भदंत म्हणाले की, मंदिर मस्जिद गुरुद्वार चर्च इत्यादी मंदिरे यांची त्यांच्याकडे असते परंतु बौद्धगया हे एकमेव मंदिर असून ते बौद्धांच्या ताब्यात नाही. कायद्यान्वे बुद्धगया येथील महाबोधी महाविहार हे महाबोधी महाविहार हे युनोस्को नुसार जागतिक धरोहर असून हे बौद्ध ऐवज ब्राह्मणाच्या ताब्यात असून संविधान कलम १३,१४,१५,२५ आणि २६ चे पूर्णतः उल्लंघन आहे. या ठिकाणी गौतम बुद्धांना ज्ञान प्राप्त झाल्याने सम्राट अशोकांनी निर्माण केलेले हे महाविहार जागतिक बुद्धांच्या रस्तेचा आणि अस्मितेचा विषय आणि म्हणून आता कोणत्याही परिस्थितीमध्ये हे महाबोधि विहार मुक्त करण्याची वेळ आलेली आहे असे भदंत डि.शिल रत्न म्हणाले. मंठा येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये धरणे आंदोलन करण्यात आले. उपस्थितांना समायोजित मार्गदर्शन डॉ.धोंडोपंत मानकर, डॉ किशोर त्रिभुवन,रंगनाथ बापू वटाणे,सरपंच भारत उघडे, सुभाष जाधव,अंबादास खरात, लक्ष्मणराव वाघमारे यांनी केले अध्यक्षीय समारोपा मध्ये प्रा सोनारी कामिठे यांनी बिहार सरकार जागे व्हा अन्यथा आंदोलन तीव्र करणात येईल असा इशारा दिला. उत्कृष्ट संचालन महेंद्र टेकुळे यांनी केले सर्वांनी महाबोधि विहार मुक्त झालेच पाहिजे अशा भावना व्यक्त करण्यात आल्या. यावेळी तहसीलदार कार्यालयाचे नायब तहसीलदार काळदाते यांना निवेदन देऊन महामहिम राष्ट्रपती यांच्या नावे निवेदन देण्यात आले. निवेदनावरती स्वाक्षऱ्या अरुण वाघमारे,दत्तराव चोरमारे,गौतम सदावर्ते,गौतम अंभोरे,रमेश खरात,शरद मोरे,नंदकिशोर प्रधान,अशोक अवचार,दीपक शेळके,विठ्ठल ठाकरगे,गंगाराम गवळी,सिद्धार्थ खरात,सहदेव अंभोरे,मिलिंद अंभोरे,सुमेध आवारे,करण वटाणे,अजय गोंडगे,शुभम अंभोरे,अशोक रणवीर,विकास प्रधान,नितीन खाडे,विशंबर वटाणे,भगवान वाघ,किरण गवळी,शुभम वाघमारे,मंगेश गवळी,स्वप्नील गोंडगे,धम्मानंद वाघमारे, दीपक बनसोडे,यश जाधव,सचिन खंदारे,भीमराव मुंढे,नरेंद्र वाघमारे,दादाराव वाघमारे,व्ही.बी मोरे,महेंद्र मोरे,ज्योती खाडे,जया आखाडे,वर्षा आखाडे, छाया खरात,सुषमा मगर,चंद्रकला कांबळे,विमल गायकवाड, सुशीला बनसोडे,मगर संगीता, गायकवाड,कांता कांबळे,सुनीता कोल्हे,सरस्वती कॉलेज,प्रयाग बाई कांबळे, बायजाबाई चोरमारे,कविता मोरे,मनोरमा पंडित,रचना मोरे,उज्वला मोरे, रेखा प्रधान,रमा वाघमारे,अनिता वाघमारे,आदिती खरात,आदिती खंदारे,अक्षरा वाघमारे,पूर्वी खंदारे,अमित खरात व गोलू पांजगे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## अल्लाह च्या मर्जीनुसार सर्व घडते

या जगाचा स्वामी ज्याला आपण ईश्वर, परमेश्वर किंवा अल्लाह म्हणतो.तो या जगाचा दाता आहे व त्याच्या मर्जीनुसार जगाचा कारभार होत असतो. सर्व भावना तोच निर्माण करतो.दैनंदिन जीवन जगत असतांना प्रत्येकाला विविध प्रश्नांना सामोरे जावे लागते.प्रत्येक व्यक्तिच्या काही ना काही ईच्छा, आकांक्षा,अपेक्षा,ध्येय, उद्दिष्टे असतात.यांच्या प्राप्तीसाठी तो सर्व प्रकारच्या मार्गाचा अवलंब करीत असतो. पद,प्रतिष्ठा,सत्ता, संपत्ती,पैसा,मान, सम्मान या बाबींसाठी सर्व काही करण्याची त्याची तयारी असते. इस्लाम धर्मात मात्र यापैकी एकाही गोष्टीला थारा नाही.कारण या सर्व गोष्टी अल्लाह कडून मिळणाऱ्या असतात. तुमच्या नशिबात असतील तर मिळतील अन्यथा तुम्ही किती ही प्रयत्न केले तरी व्यर्थ. कुरआन शरीफ मध्ये अल्लाहने म्हटल्याप्रमाणे या दुनियेत आपण सर्व मुसाफिर आहोत.या दुनियेनंतरची अजून एक दुनिया आहे जेथे आपण कायम वास्तव्य करणार आहोत.येथे जगतांना केलेल्या प्रत्येक कृत्याचा हिशोब आपणास तेथे दयावा लागणार आहे. त्या नुसारच स्वर्ग कि नरक म्हणजे जन्नत कि दोजख किंवा जहन्नुम याचा निर्णय होईल. आपल्या मनातील स्वैर ईच्छांना लगाम घालण्याचे काम रोजा करतो तर रमजान मधील रात्रीच्या जादा नमाज रुपी प्रार्थनेतून




ईश्वराची आराधना करण्याचे कार्य केले जाते. रोजा मध्ये तीव्र ईच्छा असून ही आपल्या मूलभूत गरजा असलेल्या भूक व तहान यावर आपण स्वतःच नियंत्रण ठेवतो.जो स्वतःवर नियंत्रण ठेवतो तो ईतर गोष्टींवर ही जय मिळवू शकतो. अल्लाहची श्रध्दा व भिती हे कार्य करण्यास सहायभूत ठरते.रात्रीची जादा प्रार्थना नमाजे तरावीहच्या रूपाने अल्लाहच्या आदेशांचे स्मरण करून आपल्यात एकाग्रता निर्माण करते. मनमानी जीवन न जगता रबचाही जीवन जगण्याची प्रेरणा या प्रार्थनेतून मिळते व जन्नत (स्वर्ग) प्राप्ती जे आपले ध्येय आहे याकडे वाटचालीचा मार्ग सुकर करण्याचे कार्य रमजान महिन्यात घडते.मुळात या दुनियेत जगतांना आपण कसे जगावे याची आदर्श आचारसंहिता अल्लाहने कुरआन शरीफ च्या माध्यमातून आपल्याला दिली आहे. त्यातील मार्गदर्शनानुसार आपण वागल्यास आपले जीवन सफल होणार आहे. कुरआन मध्ये जीवनाच्या सर्वच प्रश्नांची उत्तरे सामावलेली आहे. उदाहरणार्थ मातापिता (वालदैन)यांचे संदर्भात कुरआन मध्ये अल्लाहने म्हटले आहे कि जेव्हा तुमचे मातापिता वृध्द(बुढे) झाल्यास त्यांना झिडकारू नका, त्यांच्याशी उंच आवाजात बोलू नका, त्यांना त्रास होईल असे वागू नका.तुमच्या बालपणी त्यांनी खूप कष्ट घेऊन तुमचे संगोपन,पालनपोषण केले आहे,तेव्हा त्यांचा योग्य सन्मान राखणे, त्यांच्याकडे लक्ष देणे ही आता तुमची जबाबदारी आहे.कुरआन मधील ही शिकवण प्रत्येकाने अंगिकारल्यास जगात वृध्द आश्रम दिसणारच नाहीत.(क्रमशः)

**सलीमखान पठाण**
**9226408082.**

# जनशताब्दी एक्सप्रेसला परतुर रेल्वे स्थानकात पुन्हा मिळाला थांबा...

### खासदार संजय जाधव यांच्या मागणीला यश...

**दैनिक युवक आधार**
**परतूर - जालना(अशोक ठोके)**

परतुर रेल्वे स्थानकात मुदत संपल्याने 14 मार्चपासून जनशताब्दी एक्सप्रेसचा थांबा रद्द करण्याच्या हालचाली रेल्वे प्रशासनाकडून चालू असतानाच पुन्हा सहा महिने या गाडीला एक्सटेन्शन देत थांबा वाढवण्या बाबत परभणी लोकसभेचे खासदार संजय जाधव यांनी पाठपुरावा करत अखेर जनशताब्दी एक्सप्रेस पुन्हा सहा महिने परतुर स्थानकात थांबणार आहे. याबाबत नांदेड रेल्वे विभागाने पत्र जाहीर करत सदरील थांबा सहा महिने वाढवला आहे. रेल्वे प्रशासनाच्या या निर्णयाचे सर्व प्रवासी वर्गाने स्वागत करत खासदार संजय जाधव यांचे आभार मानले आहे. सदरील थांबा रद्द होण्याबाबत सर्वच संघटनांच्या वतीने रोष व्यक्त करण्यात आला होता. यात परभणीचे खासदार संजय जाधव यांच्या सोबत भ्रमण धनी द्वारे परतुर व्हाईस ऑफ मीडियाचे अध्यक्ष अजय देसाई व पदाधिकाऱ्यांनी चर्चा करत सदरील जनशताब्दी एक्सप्रेस कायमस्वरूपी परतुर स्थानकात थांबावी अशी मागणी त्यांच्याकडे केली होती. याबाबत खासदार जाधव यांनी नांदेड विभागीय मंडळ अधिकाऱ्यांशी चर्चा करत परतुर सह सेलू हा रद्द झालेला थांबा पुन्हा वाढवण्याच्या सूचना देखील केल्या होत्या. परतुर स्थानकाच्या तिकिटाच्या माध्यमातून उत्पन्न चांगले असताना देखील परतुरचा थांबा रद्द का हा रास्त सवाल बातमीच्या माध्यमातून उपस्थित केला होता. या सर्व बाबींची दखल घेऊन अखेर रेल्वे प्रशासनाने सहा महिन्यासाठी जनशताब्दी एक्सप्रेस चा थांबा वाढवला आहे. याबाबत परभणीचे खासदार संजय जाधव यांनी चर्चा करताना म्हटले की जन्मशताब्दी एक्सप्रेसचा सहा महिन्यासाठीच नव्हे तर नेहमीसाठी परतुर स्थानकात थांबा राहणार आहे याबाबत रेल्वे वरिष्ठाशी माझी चर्चा देखील झाली असून सचखंड व नरसापुर सारख्या मोठा लांब पल्ला असलेल्या गाड्या परतुर स्थानकात थांबण्याबाबत देखील रेल्वे प्रशासन विचाराधीन असल्याचे ते म्हणाले याशिवाय येत्या 19 मार्च रोजी विधिमंडळामध्ये मी मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते जालना वंदे भारत एक्सप्रेस ही परभणी पर्यंत आणण्याची मागणी करणार असून रेल्वे अधिकारी याबाबत सकारात्मक विचार करतील अशी आशा त्यांनी व्यक्त केल्या आहे वंदे भारत जर परभणी पर्यंत आली तर तिला देखील परतुर



स्थानकामध्ये थांबा देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन खासदार संजय जाधव यांनी सांगितले आहे. दरम्यान व्हॉइस ऑफ मीडियाचे सचिव अर्जुन पाडेवार, राजकुमार भारुका, केदार शर्मा, कैलास सोळंके, अशोक ठोके,माणिक जयस्वाल, केदार शर्मा,बालाजी ढोबळे, आशिष गारकर , भाऊसाहेब मुके, राज भदर्गे सह अनेकांनी जनशताब्दी ला परतुर स्थानकात थांबा वाढवण्यासाठी प्रयत्न केल्याबद्दल नागरिकांनी सर्वांचे आभार व्यक्त केले आहे.

# अनियमित ऱ्हदयाच्या ठोक्यांमुळे अंथरुणाला खिळलेल्या ७१ वर्षीय रुग्णावर यशस्वी उपचार

## मेडट्रॉनिक मायक्रा ड्युअल चेंबर लीडलेस पेसमेकरचे यशस्वी प्रत्यारोपण

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई प्रतिनिधी**

हृदयाचे ठोके हे मिनिटाला ६० पडणे आवश्यक असते मात्र जेव्हा काही रुग्णामध्ये ते अनियमित असतात तेव्हा त्यांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. अशा रुग्णाला हृदयाचे ठोके नियमित करण्यासाठी पेसमेकर लावला जातो. अशाच एका ७१ वर्षीय रुग्णावर कोणतीही शस्त्रक्रिया, चिरफाड न करता मेडिकवर हॉस्पिटलचे वरिष्ठ इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. केशव काळे यांच्या नेतृत्वाखाली टिमने मेडट्रॉनिक मायक्रा लीडलेस पेसमेकरचे इम्प्लांट केले. ज्यामुळे हृदयाचे ठोके नियमित होऊन त्याचे प्राण वाचविण्यात डॉक्टरांना यश आले. रुग्ण आता पूर्णतः बरा झाला असून शस्त्रक्रिया न करता त्याने त्याचे दैनंदिन जीवन पुन्हा सुरू केले आहे. हृदयाचे ठोके कमी असतील तर ऑक्सिजनयुक्त रक्ताचा पुरवठा




कमी होतो. त्यामुळे श्वास अडतो, चक्कर येते. अशीच घटना खारघर येथील रुग्ण श्री. बिमल तिवारी यांच्या सोबत घडली असून यामुळे हळूहळू त्यांचे दैनंदिन जीवन आव्हानात्मक होऊ लागले. त्यांना कोणत्याही आधाराशिवाय चालणे अशक्य झाले होते आणि त्यांना मुर्च्छा येऊन पडण्याची भीती वाटत होती. दैनंदिन कामांसाठी त्यांना त्याच्या कुटुंबावर अवलंबून रहावे लागत होते. श्री तिवारी यांना कोरोनरी अँजिओग्राफी आणि पेसमेकर इम्प्लांटेशनसाठी दुसऱ्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, ही प्रक्रिया त्यांना त्यांचे जीवन परत मिळवून देऊ शकली असती. परंतु त्याचवेळी डॉक्टरांना आढळले की त्यांना गंभीर थ्रोम्बोसाइटोपेनिया (प्लेटलेट संख्या ६०,००० हून कमी) आहे, ही अशी स्थिती आहे ज्यामुळे त्यांना जीवघेणा रक्तस्त्राव होण्याची शक्यता होती. शस्त्रक्रियेचे उच्च धोके पाहता, पेसमेकर इम्प्लांटेशन शक्य झाले नाही. त्यांची तब्येत आणखी खालावत चालली होती. त्यानंतर त्यांनी मेडिकवर हॉस्पिटल कडे धाव घेतली. अचानक बेशुद्ध पडल्यानंतर त्यांना गंभीर स्थितीत त्यांना मेडिकवर हॉस्पिटलमध्ये डॉ. केशव काळे निरीक्षणाखाली ठेवण्यात आले. आपत्कालीन परिस्थिती ओळखून, डॉ. काळे यांनी रात्रीच्या वेळी तात्पुरते पेसमेकर इम्प्लांटेशन केले, ज्यामुळे रुग्ण स्थिर झाला. केवळ ७०,००० प्लेटलेट संख्या असल्याने पारंपारिक पेसमेकर शस्त्रक्रिया खूप धोकादायक ठरली असती. म्हणून रुग्णाची प्रकृती स्थिर झाल्यानंतर त्याच्यावर मेडट्रॉनिक मायक्रा लीडलेस पेसमेकर प्रक्रिया करण्याचे निश्चित केले. नवी मुंबईतील मेडिकवर हॉस्पिटलचे वरिष्ठ इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. केशव काळे सांगतात की, रुग्णाचा गंभीर थ्रोम्बोसाइटोपेनिया (रक्तातील कमी झालेले प्लेटलेट्स) लक्षात घेता, पारंपारिक पेसमेकर इम्प्लांटेशन करणे हा पर्याय योग्य नव्हता, कारण त्यामुळे रक्तस्त्राव होण्याचा धोका होता. मेडट्रॉनिक मायक्रा लीडलेस पेसमेकर हा त्याच्यासाठी सर्वात सुरक्षित आणि सर्वात प्रगत पर्याय होता. रुग्णाच्या कुटुंबातील सदस्यांशी आणि वैद्यकीय टिम सोबत सखोल चर्चा केल्यानंतर, लीडलेस पेसमेकर निवडण्याचा निर्णय घेण्यात आला. पेसमेकर हा ब्रॅडीकार्डियावरचा उपाय असून त्यामुळे हृदयाचे ठोके नियमित होतात. त्यामुळे हृदयाला विजेचे तरंग दिले जातात व त्यामुळे हृदयाचे ठोके वाढतात. कॅथेटरमधून हा पेसमेकर पाठवला जातो व हृदयात बसवला जातो. डॉ. केशव काळे पुढे सांगतात की , हे उपकरण लीडलेस आणि कमीत कमी आक्रमक असल्याने, गुंतागुंत होण्याची शक्यता कमी करते, सुरक्षितता आणि दीर्घकालीन कार्यक्षमता दोन्ही सुनिश्चित करते. लीडलेस पेसमेकर हे असे उपकरण आहेत जे पारंपारिक पेसमेकरच्या विपरीत हृदय गती सामान्य राखतात. लीडलेस पेसमेकरला हृदयाशी जोडण्यासाठी कोणत्याही शस्त्रक्रिया किंवा बॅटरी आणि लीडची आवश्यकता नसते. लीडलेस पेसमेकर हे असे उपकरण आहे जे कॅथेटरद्वारे उजव्या खालच्या हृदयाच्या चेंबरशी थेट जोडलेले असते. त्याला शस्त्रक्रिया आणि लीडची आवश्यकता नसल्यामुळे, रक्तस्त्राव, गुंतागुंत आणि संसर्ग होण्याची शक्यता कमी असते. प्रक्रियेनंतर रुग्णाचा रुग्णालयातील कालावधी कमी होतो आणि गतिशीलता सुधारते. रुग्णाला शस्त्रक्रियेनंतर फारशी काळजी घेण्याची आवश्यक नसते. कॅथ लॅबमध्ये कोणत्याही प्रकारची भूल न देता केल्या जाणाऱ्या या प्रक्रियेसाठी सुमारे 2 तास लागतात. या प्रक्रियेनंतर, रुग्णाला दुसऱ्याच दिवशी रुग्णाला घरी सोडले जाते. पारंपारिक पेसमेकरच्या विपरीत, लीडलेस पेसमेकरसाठी किमान खबरदारी घ्यावी लागते. हे प्रगत तंत्रज्ञान ब्रॅडीकार्डिया (हृदय गती मंदावणे) व्यवस्थापित करण्यासाठी एक उत्तम उपाय आहे. श्री तिवारींना त्यांच्या पायावर परत उभे राहून, त्यांचे सामान्य जीवन जगताना पाहणे हे डॉक्टर म्हणून आमच्यासाठी सर्वात मोठे बक्षीस आहे. ही कामगिरी रुग्णालयाच्या वैद्यकीय उत्कृष्टता आणि नाविन्यपूर्णतेचे उत्तम उदाहरण ठरले आहे. माझ्या या गंभीर आरोग्य स्थितीमुळे मी सर्व आशा गमावल्या होत्या, परंतु मेडिकवर हॉस्पिटलने मला आयुष्य जगण्याची दुसरी संधी दिली. डॉ. केशव काळे आणि त्यांच्या टीमने मला केवळ वाचवले नाही तर माझे स्वातंत्र्य देखील परत मिळवून दिले अशी प्रतिक्रिया रुग्ण श्री. बिमल तिवारी यांनी स्पष्ट केली.

## गुरुजी फाऊंडेशनने फुलवले चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर समाधान ,जि.प.कन्या शाळा दिले स्मार्ट टि.व्ही. भेट

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**उमरी -** तालूक्यातील VPK उद्योग समुहाशी संलग्न गुरुजी फाऊंडेशन ने जिल्हा परिषद कन्या प्राथमिक शाळेतील मुलींना स्मार्ट व तंत्रज्ञानाच्या साह्याने शिक्षण मिळावे म्हणून 55 इंची टी.व्ही. भेट दिला असून, जिल्हा परिषद कन्या प्राथमिक शाळा उमरी येथे झालेल्या कार्यक्रमात उमरी तालूक्याचे गट शिक्षणाधिकारी श्री. नंदकुमार कुलकर्णी, व शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. संगिता सिंगरवाड, यांना गुरुजी फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री.संदिप पाटील कवळे व संचालिका सौ. पूजा पाटील कवळे जाधव,
सर्व पदाधिकारी यांनी सूपूर्द केला.
याप्रसंगी गट शिक्षणाधिकारी श्री.कुलकर्णी म्हणाले, श्री.मारोतराव कवळे गुरूजी, यांनी घालून दिलेल्या आदर्शाचा वारसा त्यांच्या मुलांनी पुढे चालू ठेवला, व्याख्याते भाषण करणारे जागोजागी भेटतात पण दाते दान करणारे खूप कमी असतात. समाजाच्या हितासाठी श्री.कवळे गुरूजी, नेहेमीच अग्रेसर असतात, यापूर्वीही त्यांनी अनेक जि.प. शाळांना संगणक,प्रोजेक्टर भेट दिले आहेत. असेही त्यांनी सांगीतले. माझे वडील व माझे कुटूंब गुरुजी फाऊंडेशनच्या माध्यमातून सातत्याने समाज उपयोगी कार्य करीत आहोत, शाळांच्या सोबतच उमरी धर्माबाद नायेगांव या तालुक्यात आम्ही शेतकऱ्यांच्या जलसिंचनासाठी बंधारे बांधण्याचे कार्य हाती घेतले आहे, या शाळेस आम्ही यानंतरही अध्ययन पुरक वस्तु पुराविण्याचा प्रयत्न करू असे आश्वासन फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री.संदिप पाटील कवळे व पूजाताई कवळे जाधव यांनी दिले तर आम्ही शाळेत शिकतांना मला अनेक अडचणी आल्या,त्या माझ्या बाबांनी सोडविल्या पण या शाळेत शिकणाऱ्या अनेक मुलींची अडचण सोडविण्याची आर्थीक परिस्थिती त्यांच्या पालकात असतेच असे नाही. मग त्यांच्या शिक्षणाचे काय हा प्रश्न मला पडला म्हणूनच या शाळेला काहीतरी द्यावे असा विचार आला म्हणून गुरुजी फाऊंडेशनच्या माध्यमातून आम्ही एक पुष्प अर्पन करीत आहोत. याप्रसंगी शिक्षण विस्तार अधिकारी श्री शंकर बेळकोणे,केंद्र प्रमुख श्री. संतोष चाटोरीकर, यांनी गुरुजी फाऊंडेशनने केलेले कार्य अविस्मरणीय व गौरवपूर्ण आहे.आम्ही त्यांचे आभारी आहोत असे गौरवोद्गार काढले. या कार्यक्रमास मा.नगराध्यक्ष श्री.सुभाष पेरेवार,गुरुजी फाउंडेशनचे श्री.लक्ष्मणराव पाटील हारेगांवकर,उपाध्यक्ष श्री. मधुकरराव पाटील बोळसेकर, उत्तमराव होनशेट्टे, सचिव श्री. सुनिल जोगदंड,संचालक तथा कार्यवाह श्री.यु.जी.कदम मा. शि.वि.अ.तळेगांव बिट,श्री. बाबूराव भोसले,श्री.प्रशांत कदम नायेगाव,श्री.उत्तमराव जाधव मा.संचालक मार्केट कमिटी श्री.संदिप बादलवाड अध्यक्ष शा.व्य.स.केंद्र उमरी, सौ.वर्षा पडोळे, अध्यक्ष कन्या शाळा उमरी,सौ. वर्षा जाधव, यांच्यासह अनेक पालक व सर्व शिक्षक उपस्थित होते, आभार प्रदर्शन सौ.वत्सला पाटील यांनी केले.




## रंगांची अडचण असणाऱ्यांनी देश सोडून जावे

**उत्तर प्रदेशच्या मंत्र्याचे वक्तव्य**

प्रयागराज : ज्या लोकांना होळीच्या रंगांचा त्रास होत असेल त्यांनी भारत हा देश सोडून निघून जावे. मुळात मुस्लीम समुदायदेखील रंगांपासून दूर नाही. त्यांच्याही घरात आणि आयुष्यात विविध रंग आहेत. तेदेखील त्यांची घरे रंगवतात. पण काही लोक रंगांमध्ये विष कालवून समाजात अस्थिरता निर्माण करू पाहताहेत, असे वक्तव्य उत्तर प्रदेश सरकारमधील मंत्री आणि निषाद पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय निषाद यांनी केले आहे. त्यामुळे होणी सणाच्या पार्श्वभूमीवर नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

यंदा धुलीवंदनाचा सण शुक्रवारी साजरा केला जाणार आहे. शुक्रवारी मुस्लीम समुदायही मोठ्या संख्येने मशिदींमध्ये जाऊन सामूहिक नमाज पठण करतो. या दिवशी तणाव निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याबाबत संजय निषाद म्हणाले, "शुक्रवारी नमाज पठण करणारे लोक एकमेकांची गळाभेट घेतात. तसेच होळी साजरी करणारे लोकही गळाभेट घेतात. दोन्ही गळाभेट घेणे व आनंद साजरा करणारे उत्सवप्रेमी आहेत. काही राजकारणी असे आहेत, जे लोकांना एकत्र येऊ देत नाहीयेत. हे लोक समाजात विष कालवण्याचा प्रयत्न करतात."

"आमचा पक्ष निषाद समुदायाला एकत्र ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे. आमचा पक्ष भाजपसोबत युतीत असला तरी आम्ही आमची ओळख कायम ठेवली आहे. आम्ही निषाद समुदायाच्या हितासाठी काम करत राहू. तसेच निषाद समुदायाचे समर्थन करणारी भाजप मजबूत व्हावी, यासाठी देखील आम्ही काम करत आहोत. समुदाय आमच्या बाजूने आहे. समाजात अस्थिरता पसरवणाऱ्या कोणत्याही रणनितीला आमचा समुदाय व उत्तर प्रदेशमधील जनता बळी पडणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

**होळीमुळे अर्थव्यवस्था सुधारते : संजय निषाद**

निषाद पार्टीचे प्रमुख म्हणाले, "होळीमुळे देशाची अर्थव्यवस्था सुधारते. त्यामुळे आपोआप सर्वांच्या घरी सुख व शांतीचे आगमन होते. भारतीय संस्कारांनुसार सण हे आनंद साजरा करण्यासाठी असतात. सणांच्या निमत्ताने लोक आपसातील कटूता दूर करण्यासाठी पुढाकार घेतात, एकमेकांची गळाभेट घेतात. त्यामुळे ज्याला कोणाला रंगांची अडचण असेल त्यांनी केवळ त्यांचे घर नव्हे, तर हा देश सोडून निघून जावे.

## सेन्सेक्स २०० अंकांनी घसरला

**मुंबई :** होळीच्या दिवशी शेअर बाजारात मोठी चढ-उतार दिसून आली. सेन्सेक्स व निफ्टी दोन्ही निर्देशांक गुरुवारी घसरले. सेन्सेक्स २०० अंकांनी घसरून ७३,८२८ तर निफ्टी ७३ अंकांनी घसरून २२,३९७ वर बंद झाला. आशियाई बाजारात तेजीचे वारे वाहत होते. जपानचा निक्केई, हाँगकाँग वधारला तर चीनचा बाजार घसरला. परदेशी वित्तसंस्थांनी १२ मार्च रोजी भारतीय शेअर बाजारात १६२७.६१ कोटींचे समभाग विकले. तर भारतीय वित्तसंस्थांनी १५१०.३५ कोटींचे समभाग खरेदी केले. अमेरिकेचा डाऊ जोन्स ०.२० टक्के तर नॅसडॅक १.२२ टक्क्याने वधारला.

## इस्त्रोचे स्पेस डॉकिंग यशस्वी

**श्रीहरीकोटा :** भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने स्पेस डॉकिंग प्रयोग 'स्पेडेक्स' अंतर्गत दोन उपग्रहांची यशस्वी अनडॉकिंग केली. ही कामगिरी भारताच्या अंतराळ मोहिमांसाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. यामुळे भारतीय अंतराळ स्थानक आणि चांद्रयान ४ सारख्या भविष्यातील मोहिमांचा मार्ग मोकळा झाला आहे. ३० डिसेंबर २०२४ रोजी श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून प्रक्षेपित केलेल्या या मोहिमेचे उद्दिष्ट स्पेस डॉकिंग-अनडॉकिंग तंत्रज्ञानाची चाचणी करणे होते.

## प्राथमिक आदर्श केंद्रशाळा चिरनेर चे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

. रायगड जिल्हा परिषद केंद्रशाळा चिरनेरचे वार्षिक स्नेहसंमेलन बुधवार दिनांक १२ मार्च रोजी शाळेच्या भव्य प्रांगणात मोठ्या उत्साहात संपन्न झाले. सदर स्नेहसंमेलनाचे उद्घाटन दानशूर उद्योगपती श्री राजाशेठ खारपाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस गणपती, सरस्वती आणि हिंदवी स्वराज्याचे छत्रपती , रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन आणि दिप प्रज्वलनाने झाली. यानंतर कार्यक्रमाचे उद्घाटक राजाशेठ खारपाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. यावेळी उद्योगपती राजाशेठ खारपाटील, आवाज हामुंबईचा चॅनेल चे संपादक तथा रायगड जिल्हा उत्कर्ष





समिती चे अध्यक्ष मिलिंद खारपाटील, सरपंच भास्कर मोकल, उपसरपंच अरुण पाटील, माजी सभापती शुभांगी पाटील, ग्रामपंचायत सदस्य पद्माकर फोफेरकर, निकिता नारंगीकर, निलम चौलकर, भारती ठाकूर,उरण इंटक चे अध्यक्ष राजेंद्र भगत, सेवानिवृत शिक्षक अशोक कांबळे, आदर्श शिक्षिका चैताली म्हात्रे,शिवसेना नेत्या ज्योती म्हात्रे, शाळा व्यवस्थापन कमिटी चे अध्यक्ष सचिन म्हात्रे, माजी अध्यक्ष प्रवीण म्हात्रे,शाळा व्यवस्थापन कमिटी चे सदस्य गजेंद्रसिंग राजपुरोहित, मुख्याध्यापक विश्वनाथ गावंड आणि शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते. यावेळी दानशूर उद्योगपती, चिरनेर चे विकासपुरुष,ज्यांनी चिरनेर मध्ये ज्ञानाची गंगा आणली त्या राजाशेठ खारपाटील यांनी शाळेच्या कंपाऊंड ला आकर्षक रंगरंगोटी करण्याचे जाहीर केले. गेल्या वर्षी त्यांनी शाळेतील मैदानात चिखल होऊ नये म्हणून खडी टाकली होती. आय एस ओ आदर्श शाळा पुरस्कृत शाळेतील छोट्या छोट्या बच्चे कंपनीने अतिशय सुरेख नृत्य सादर करून उपस्थित पालक आणि ग्रामस्थांची मने जिंकली. स्वागतगीत, गणेशवंदना, मंगळागौर खेळू या ,पाणी लाटा ,लुंगी डान्स, राजे , मंगळा गौर खेळू या एकापेक्षा एक सरस गाण्यांनी पालक ग्रामस्थ यांना खुर्चीस खिळून ठेवले होते .प्रत्येक गाण्यानंतर टाळ्या आणि वन्स मोअर ची मागणी होत होती. शिक्षकांनी या लहानग्या छोट्या विद्यार्थ्यांची सुरेख अशी तयारी केल्याचे दिसून आले. स्नेहसंमेलनात विद्यार्थी , पालक ,ग्रामस्थ आणि शिक्षक यांचा उत्साह आणि जल्लोष दिसून आला.रात्री उशिरापर्यंत चाललेल्या या कार्यक्रमात बच्चे कंपनी ने केलेल्या उत्कृष्ट नाच गाण्यास प्रतिसाद, अभिनंदन करण्यासाठी उपस्थित होते.यावेळी माजी सहशिक्षक तुषार ठाकूर, नीलम ठाकूर यांनाही सन्मानित करण्यात आले.

## सूरज हेमके: घाटंजीमधील मानवतेचा दिवा

### १४ मार्च २०२५ रोजी, सूरज हेमके यांनी एक असाधारण टप्पा गाठला - सलग २८०० दिवस अन्नदान.

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेंन्दोर**

घाटंजी: हे अविश्वसनीय यश घाटंजीमधील वंचित आणि उपेक्षित समुदायांच्या उत्थानासाठी त्यांच्या अढळ समर्पणाचे प्रतिबिंब आहे. "मानवतेचा देवदूत" म्हणून आदरणीय, सूरज हेमके यांनी जवळजवळ एक दशक अशा समुदायासाठी उदरनिर्वाह आणि आधार देण्यासाठी समर्पित केले आहे, सामाजिक आणि धार्मिक भेदांच्या पलीकडे जाणारी निस्वार्थी भावना मूर्त रूप देत आहे.

**सेवेचा एक प्रेरणादायी प्रवास:**
घाटंजी येथील नवीन बसस्थानकाजवळ एक लहान ब्रेड शॉप चालवणाऱ्या एका सामान्य कुटुंबात जन्मलेल्या सूरजला त्याच्या समाजातील निराधार आणि मानसिक रुग्णांच्या संघर्षांना पाहून सेवेची आवड निर्माण झाली. त्याचा प्रवास एका साध्या पण खोल विचाराने सुरू झाला.: समाजाने सोडून दिलेल्यांना कळकळ आणि करुणा दाखवणे. या जाणीवेमुळे त्यांनी अन्नदान मोहीम सुरू केली, जी आता "जिव्हाळ्यांची उपक्रम भिंत" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एका व्यापक सामाजिक उपक्रमात रूपांतरित झाली आहे.

**उत्सवांद्वारे एकता साजरी करणे:**
सूरजचा सेवेचा दृष्टिकोन समावेशकता आणि आंतरधर्मीय सलोख्यात खोलवर रुजलेला आहे. गुढी पाडवा, रमजान,छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती यासारख्या महत्त्वाच्या प्रसंगी ते गरजूंसाठी भव्य मेजवानी आयोजित करतात. या उत्सवांदरम्यान, तो धार्मिक संलग्नतेपेक्षा मानवतेला प्राधान्य देण्यावर भर देतो. *त्यांचे ब्रीदवाक्य, "मी हिंदूही राहणार नाही आणि मुस्लिमही राहणार नाही; "मी मानवतेचा पुत्र होईन,"* असे विविध समुदायांमध्ये एकता वाढवण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे.



**उदारतेचा एक विक्रम:**
२,८०० पेक्षा जास्त दिवस दररोज जेवण पुरवण्याची सूरजची कामगिरी त्याच्या समर्पणाची स्तुती करते. "वॉल ऑफ लव्ह" हा उपक्रम, ज्याला धर्मादाय मित्र आणि कुटुंबाच्या नेटवर्कचा पाठिंबा आहे, गरजू लोकांपर्यंत पोहोचण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यांचे आईवडील, अशोकराव आणि ज्योतीताई, त्यांच्या पत्नीसह, या प्रयत्नात अविभाज्य आहेत, जे सामाजिक कार्यात कौटुंबिक पाठिंब्याचे महत्त्व निर्माण करतात.

**गरजूंसाठी नाविन्यपूर्ण उपक्रम:**
सूरजची करुणा अन्नदानाच्या पलीकडे जाते. तो रक्तदान मोहीम, कपडे वाटप आणि अनाथ मुलांसाठी शैक्षणिक मदत यासारख्या विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी होतो. 'जिव्हाळ्यांची भिंत आहे' हा त्यांचा एक अनोखा प्रकल्प, सणांच्या वेळी निराधार मातांना साड्या आणि चोळी भेट देऊन त्यांचा सन्मान करतो, प्रत्येक व्यक्तीला प्रतिष्ठा आणि आदर मिळायला हवा या कल्पनेला बळकटी देतो.

**समुदाय सहभाग आणि स्वयंसेवा:**
सूरजच्या प्रयत्नांनी प्रेरित होऊन, स्थानिक तरुणांनी त्याच्या कार्यात सामील होण्यासाठी गर्दी केली आहे. कोणीही मागे राहू नये म्हणून ते एकत्रितपणे दैनंदिन सेवा प्रदान करतात. विलास पवार सारख्या समर्थक व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली, सूरजने रक्तदान मोहिमेसह विविध धर्मादाय उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी स्वयंसेवकांना एकत्रित केले आहे ज्यामुळे समाजातील असंख्य व्यक्तींना फायदा झाला आहे.

**आशेचा वारसा**
सूरज हेमके यांचे उल्लेखनीय कार्य अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. तो स्वतःच्या आयुष्यातील आव्हानांना तोंड देत असताना, व्यवसाय चालवत असताना आणि ताणतणावांचे व्यवस्थापन करत असताना, इतरांची सेवा करण्याची त्याची अढळ वचनबद्धता दिसून येते. त्याची आर्थिक परिस्थिती भलेही चांगली नसली तरी गरजूंना मदत करण्याची त्याची इच्छा अतुलनीय आहे. अलिकडेच, त्यांनी स्थानिक सरकारी रुग्णालयात रुग्णांसाठी जेवणाची व्यवस्था करण्यास सुरुवात केली आहे आणि कठीण परिस्थितीत असलेल्या व्यक्तींना मदत करत आहेत. इतरांच्या फायद्यासाठी वैयक्तिक वस्तूंचा त्याग करण्याची त्याची तयारी यातून सूरजचे समर्पण स्पष्ट होते. * जेव्हा एका गर्भवती महिलेला तातडीने वैद्यकीय मदतीची आवश्यकता होती, तेव्हा त्याने खर्च भागवण्यासाठी त्याचे सोन्याचे लॉकेट विकले,* ज्यामुळे तरुणांना कृती करण्यास प्रेरित करणारी सहानुभूतीची पातळी दिसून आली.

**तरुणांसाठी कृतीचे आवाहन**
सूरज हेमके यांच्यात दान आणि सामुदायिक सेवेची भावना आहे. त्यांची कहाणी आपल्याला आठवण करून देते की प्रतिकूल परिस्थितीतही एखादी व्यक्ती महत्त्वपूर्ण प्रभाव पाडू शकते. एकत्र येऊन, आजचे तरुण सूरजच्या उदाहरणाचे अनुकरण करू शकतात, हे सिद्ध करून की सामूहिक प्रयत्नांमुळे मोठे बदल घडू शकतात.
ज्या जगात सोशल मीडिया अनेकदा वास्तविक जीवनातील योगदानांना झाकून टाकतो, तिथे सूरज हेमके एक खरा मानवतावादी म्हणून उभा राहतो. त्यांचा करुणा आणि सेवेचा वारसा दयाळूपणाच्या शक्तीचा पुरावा आहे, जो इतरांना त्यांच्या पावलावर पाऊल ठेवण्यास उद्युक्त करतो.

## जालन्याच्या इतिहासात प्रथमच हृदयाच्या छिद्रावरील बिनाटाक्याची शस्त्रक्रिया यशस्वी!

### !! हृदयरोग तज्ञ डॉ.कृष्णा कोरडे व कलावती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल ची किमया !!

**दैनिक युवक आधार**
**जालना प्रतिनिधी**

_परतुर तालुक्यातील दहा वर्षाचा मुलगा ज्याला मागील भरपूर दिवसांपासून दम लागत होता. टू डी इको व तपासण्यांमध्ये असं निदर्शनास आलं की त्यास हृदयामध्ये एक छिद्र (होल) असून त्यामुळेच रुग्णाला प्रचंड त्रास होत होता. डॉ.कृष्णा कोरडे, डॉ.अर्जुन सातपुते व टीमने त्यांना बिना टाक्याच्या शस्त्रक्रियेचा सल्ला दिला. महात्मा ज्योतिबा फुले योजनेअंतर्गत आपल्या जालना जिल्ह्यामध्ये प्रथमच अशा प्रकारची शस्त्रक्रिया डॉ.कृष्णा कोरडे व कलावती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलच्या टीम द्वारे यशस्वीरित्या पार पाडण्यात आली. परतुर तालुक्याचे माननीय आमदार बबनराव लोणीकर यांनी आज रुग्णाची भेट घेऊन झालेल्या उपचाराबद्दल माहिती घेतली व हॉस्पिटलला सुद्धा झालेल्या शस्त्रक्रियेबद्दल कौतुक करून शुभेच्छा दिल्या लहान मुलांवरील हृदयाच्या बिना टाक्याच्या शस्त्रक्रिया या नक्कीच थोड्या किचकट स्वरूपाच्या असतात परंतु रुग्णांच्या नातेवाईकांना विश्वासात घेऊन आजपर्यंतच्या अनुभवावर व संपूर्ण कलावती हॉस्पिटलच्या टीमवर मला विश्वास होता की ही शस्त्रक्रिया आपण यशस्वीरित्या पार करू शकतो. बिना टाक्याच्या शस्त्रक्रियामुळे रुग्णाला आपण 24 तासातच सुट्टी दिली. अँजिओग्राफी एन्जोप्लास्टी, मेंदू व मणक्यावरील शस्त्रक्रिया , बायपास, वाल रिप्लेसमेंट , गुडघा व खुबा बदल्याच्या शस्त्रक्रिया अशा अनेक किचकट आजारांवरील उपचार कलावती हॉस्पिटलमध्ये सुरू आहे जेणेकरून रुग्णांना मोठ्या




शहरांमध्ये किंवा दूर जाऊन उपचार करण्याची गरज पडणार नाही.

**_ डॉ.कृष्णा मदनराव कोरडे(हृदयरोग तज्ञ)**
**कलावती हॉस्पिटल जालना**

येणाऱ्या काळात जालन्यामध्ये सुद्धा आंतरराष्ट्रीय दर्जाचे तंत्रज्ञान व नवनवीन उपचार पद्धती कलावती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलमध्ये आणण्याचे आमचे प्रयत्न राहील जेणेकरून त्याचा फायदा आपल्या भागातील रुग्णांना नक्कीच होईल

**_डॉ.अर्जुन सातपुते(हृदयरोग तज्ञ)**
**कलावती हॉस्पिटल जालना.**

डॉ.कोरडे व कलावती हॉस्पिटल मार्फत आंतरराष्ट्रीय दर्जाचे व अत्याधुनिक उपचार आपल्या भागातील रुग्णांवर यशस्वीरित्या होत आहेत. रुग्णसेवेच्या या कार्यात त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा.

**_ आमदार बबनराव लोणीकर**